एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

१०४ शतकोत्तर वाटचाल

• मुंबई, सोमवार १३ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-३९, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 39 Marathi - Daily - Mumbai, 13 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

आठवणीतल्या आशाताई १९३३-२०२६

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews


# ही वाट दूर जाते... स्वप्नामधील गावा ...



# स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांचे निधन

आपल्या चिरतरुण आवाजाने जगभरातील सिनेसंगीतप्रेमींना ८० हून अधिक वर्षे सुरेल मोहिनी घालणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिक आशा भोसले यांचे आज वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. छातीत संसर्ग झाल्याने काल रात्री उशिरा त्यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अनेक अवयव निकामी झाल्याने आज त्यांचे देहावसान झाले. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण संगीतसृष्टी व सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे. एका युगाचा अस्त झाल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी दुःख व्यक्त केले आहे. उद्या त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. लता मंगेशकर यांचे निधन ६ फेब्रुवारी २०२२ या दिवशी झाले. आज दुसरा तारा निखळला.

**एका युगाचा अंत**

■ मुंबई

**आशा** भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी त्यांच्या निधनाची माहिती दिली. उद्या सकाळी ११ ते २ या वेळेत लोअर परळ येथील कासा ग्रांड या निवासस्थानी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. सांगलीतील नाट्य अभिनेते आणि शास्त्रीय गायक पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्या घराण्याने भारतीय सिनेसंगीताला लता, आशा, मीना, उषा आणि हृदयनाथ मंगेशकर ही पाच अनमोल रत्ने दिली. लता मंगेशकर व आशा भोसले या दोघींनाही » पान ३ वर

## इराण-अमेरिका शांतता चर्चा निष्फळ

### ट्रम्प यांच्या अटी इराणने फेटाळल्या

**पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये इराण आणि अमेरिका यांच्यात तब्बल २१ तास चाललेली युद्धविरामाची चर्चा दोन्ही देश आपापल्या मागण्यांवर ठाम राहिल्याने निष्फळ ठरली. त्यामुळे संतप्त झालेले अमेरिकेचे उप राष्ट्राध्यक्ष आणि अमेरिकेच्या प्रतिनिधी मंडळाचे नेते जे. डी. व्हान्स तत्काळ आपल्या सहकाऱ्यांसह अमेरिकेला निघून गेले. इराणचे प्रतिनिधीही त्वरित मायदेशी परतले.**



■ इस्लामाबाद

**चर्चा** निष्फळ ठरल्यानंतर दोन्ही देशांनी एकमेकांवर टीका केली. ट्रम्प यांनी तर चर्चा होवो किंवा न होवो होर्मुज खुले करणारच असा निर्धार व्यक्त केला. इराणची सागरी नाकेबंदी करण्याची धमकीही ट्रम्प यांनी दिली. त्यामुळे संपूर्ण जगावर असलेली युद्धाची छाया अधिकच गडद झाली आहे. होर्मुजच्या सामुद्रधुनीवरील इराणचे नियंत्रण आणि इराणने आपला अणु » पान ७ वर

## ग्राहकांचा निष्काळजीपणा सिद्ध करण्याची जबाबदारी बँकेची



### ३८ लाखांचा परतावा देण्याचे हायकोर्टाचे आदेश

■ मुंबई

**चार वर्षांपूर्वी** अनधिकृत ऑनलाईन व्यवहारांद्वारे ३८.०४ लाख रुपये गमावलेल्या पुण्यातील व्यावसायिकाला उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने व्यावसायिक सुबोध कोर्डे यांनी गमावलेले ३८.०४ लाख रुपये परत देण्याचे आदेश 'एचडीएफसी' बँकेला दिले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार 'झिरो लायबिलिटी' अंतर्गत परताव्यासाठी पात्र असल्याचे स्पष्ट केले.

कोर्डे यांच्या बँक खात्यातून अवघ्या ४१ मिनिटांत आठ अनधिकृत व्यवहारांद्वारे फसवणूक झाली होती. त्यांच्या व्यवहाराची मर्यादा ४ लाख रुपयांवरून ४० लाख रुपयांपर्यंत वाढवली होती. हे व्यवहार आपण केले नसून त्यासाठी कोणताही ओटीपी प्राप्त झाला नसल्याचा दावा करून बँकेला पैसे देण्याचे आदेश द्या, अशी विनंती करीत कोर्डे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्या. भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

## शक्तीपीठ महामार्गाच्या परिसरात भोंदूबाबा अशोक खरातची जागा

■ सोलापूर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**भोंदूबाबा** अशोक एकनाथ खरात प्रकरणात तपासादरम्यान नवे धक्कादायक खुलासे होत आहेत. खरातने पुणे, शिर्डी आणि नाशिकनंतर आता सोलापुरातही कोट्यवधींची जमीन खरेदी केल्याचे उघड झाले आहे. प्रस्तावित 'शक्तीपीठ महामार्ग' प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर ही खरेदी संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण गावातील गट क्रमांक २००/१ मधील सुमारे ४.४८ हेक्टर (अंदाजे ११ एकर) जमीन खरातने स्वतःच्या नावावर घेतली आहे. २८ मार्च २०२४ रोजी झालेल्या या व्यवहाराची किंमत २ कोटी ४० लाख ९१ हजार २०० रुपये इतकी असल्याची माहिती आहे. या व्यवहारात त्याची पत्नी कल्पना खरात » पान ७ वर




# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

दादरला मेनपावर ऑफीसमध्ये फोन अटेन्ड करण्यासाठी मुली पाहिजेत. पगार 15,000/- -18,000/- **(9920270431)** {NC260051}

पेस्ट कंट्रोल कामासाठी बोरिवली/ वसई ऑफीस टेक्निशियन/ सेल्ससाठी मुले/मुली पाहिजे. **9819660542** {NC260055}

शिवडीयेथे स्टेशनजवळ कोमोरी न्यु लिथरॉन ५ कलर सेमी ऑटोप्लेट मशीनसाठी अनुभवी बॉयलर पाहिजे. त्वरित संपर्क करा- **9082517355** {NC260096}

वॉर्डबॉय आणि आया घरी नोकरी. महिना १८,००० ते २४०००/- पगार. आठवड्याचे वेतन. १००% नोकरीची हमी १२/२४ तास ड्युटी, १ वर्षाचा अनुभव आवश्यक. वाचन आणि लेखन अनिवार्य. वयोमर्यादा २०-४५. संपर्कः- CARE24, ऑफीस नंबर ५१५, पाचवा मजला, शॉपर्स पॉईंट, अंधेरी पश्चिम. स्टेशनसमोर. शुभम- **8879811238.** {NC254530}

घरातील रुग्णाची काळजी घेण्यासाठी ब्युरोमध्ये अनुभवी आया आणि वॉर्डबॉय १२ तासांसाठी पाहिजे. पगार 21,000/- **9920463209** {NC254721}

प्रभादेवी येथे 10 मेडिसीन डिलीव्हरी बॉय हवे, गरजू+ मेहनती वय 40 पेक्षा कमी, पगार ₹ 15,000/+ इंसेंटिव्ह संपर्क व बायोडेटा- **8898856005** {NC260113}

ग्रँण्ट रोड येथे घरी जेवण बनवण्यासाठी बाई पाहिजे **9869028742/ 9326232237** {NC260128}

JSS ग्रुपकरिता पाहिजेत सिक्युरीटीगार्ड १८,०००/-, सुपरवायझर २१,०००/-, ऑफीसर २५,०००/- ड्युटी एस व्ही रोड, गोरेगाव, MTNL जवळ, संपर्क- **9920334502/ 9920334503/ 9920334507** {NC260135}

## पाहिजेत

सायनयेथे ऑफसेट सोलना मशीनकरीता बॉयलर अनुभवी किंवा फ्रेश त्वरित पाहिजे. प्रमोद- **9821027981** {NC260125}

सायनयेथे २ ते ३ वर्षाचे अनुभवी डीटीपी ऑपरेटर पाहिजे. प्रमोद- **9821027981** {NC260126}




सांताक्रूझ मध्ये अत्याधुनिक इलेक्ट्रिक बसेस साठी ड्रायव्हर भर्ती चालू आहे

PF, ESIC, Gratuity चे लाभ मिळवा

सांताक्रूझ डेपो
एलआयसी कॉलनी,
सुरेश कॉलनी,
विले पार्ले पश्चिम,
मुंबई, महाराष्ट्र ४०००५४

आवश्यक कागदपत्रे
2 पासपोर्ट साइज फोटो
बॅज, लाइसेंस (2 वर्ष जुना हेवी लाइसेंस)
आधार कार्ड, पॅन कार्ड,
पोलीस पडताळणी दाखला
बँक-पासबुक प्रत

HR टेलिफोनिक मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी, कृपया तुमचा बायोडाटा, ड्रायव्हिंग लायसन्स आणि इतर कागदपत्रे whatsapp द्वारे पाठवा...

चालक, कर्मचारी, स्वच्छता आणि इतर विभागांमध्ये भरती उपलब्ध आहे.

मो : ९५०३५००१८७ / ९३७२०२३५१६

२ कलर ऑफसेट प्रिंटिंग मशीनसाठी प्रिंटर पाहिजे, विरार ईस्ट, **8286578786** {NC260124}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC254740}

मालाडमध्ये हॅन्डप्रेसच्या कामासाठी मुले / मुली पाहिजेत प.18000/- **9833730360** {NC260080}

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वॉर्डबॉय पाहिजेत. पगार- (30,000-90,000) **9820628009** {NC260149}

## पाहिजेत

प्रिंटिंग प्रेससाठी आवश्यक आहे (चिंचपोकळी, काळाचौकी)- सेंट्रल लाईनला राहणारे- 1) HR- Executive 2) प्रिंटिंग प्रेस असिस्टंट सुपरवायझर ३) ग्राफीक डिझायनर कम डिटीपी ऑपरेटर ४) स्क्रीन प्रिंटर ५) हेल्पर/ मशीन ट्रेनर. फोकस, २२ (ए) १, हकोबा कंपाऊंड, बॉम्बे कॉटनमिल, काळाचौकी, चिंचपोकळी स्टेशन (पूर्व) आणि कॉटनग्रीन स्टेशन (पश्चिम) येथून १० मिनिट चालत **8652636905** {NC260130}

लोअरपरेल, चिंचपोकळी येथे ईबाईकवर डिलिव्हरी आणि गोडाऊनकरीता तरुण पाहिजेत. पगारः 13,000 ते 15,000 + रविवारी सुट्टी, 9 ते 7 संपर्कः- **9320064643** किंवा व्हॉट्सअॅपवर **8080084843** Hi पाठवा {NC260148}

'जुहूमध्ये प्रसिद्ध कुरिअर कंपनीसाठी डिलिव्हरी व पिकअप बॉईज आणि कार्गो ड्रायव्हर पाहिजेत' :- **8355938146** {NC260140}

मुलुंड वेस्टमध्ये ऑफिसबॉय पाहिजे (वयः 35 पर्यंत). पगारः 15,000/- :- **8652446932 / 022-35772943** {NC260157}

पाहिजेत वॉचमन दादर, ठाणे करीता, १२ तास **9869876043 / 9167630931** {NC260137}

## पाहिजेत

सिक्युरिटी हाऊसकिपिंग कंपनीला-सेल्स / मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटंट, ॲडमिन, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, सिक्युरिटीगार्ड / सुपरवायजर हाऊसकिपिंग मुले / मुली पाहिजेत- **7208004613 / 14** {NC260136}

दादरमध्ये फोर व्हिलर / टेंपोसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. संपर्कः- - **9320095016 / 9322224550** {NC260182}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार+ जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटर : **9819426634/ 9969529162** {NC260054}

मालाड पूर्व स्टेशनजवळ पॅकींगसाठी मुली त्वरित पाहिजेत वय- १९ ते ३० पगार १२०००- **8828350808** {NC260107}

परेल स्टॉलवर सॅण्डवीच बनवणारा काऊंटर मुलगा पाहिजेत **8691962096** {NC260106}

कुर्ला पूर्व येथे पतपेढीसाठी महिला पाहिजे वेळ- संध्याकाळी ३ ते रात्री ९ संपर्कः **9819002908** {NC260103}

CST येथे हाऊसकिपिंगसाठी मुली पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्कः **9321022969/ 7045908864.** {NC260109}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, DRIVER, पेशंटकेअर (MALE+ FEMALE) पाहिजेत. (राहणेखाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828.** {NC26122}

त्वरित पाहिजे आहे. कंपनीसाठी हुशार अनुभवी, विश्वासू, तरुण प्यून पाहिजे. सायकल चालवता येणे आवश्यक. पत्ताः- ए टु झेड स्टिलॉइस प्रायव्हेट लिमिटेड, २९, मॅगझिन स्ट्रीट, संगम हॉटेलजवळ दारूखाना, रे रोड, मुंबई-४०००१० दूरध्वनी- **7021734143** {NC260003}

## Situation Vacant

REQUIRED IMMEDIATELY EXPERIENCED PRACTISING COMPANY SECRETARY FOR MUMBAI BASED NSE STOCK BROKER - (LIMITED COMPANY), FOR VERY BASIC SECRETARIAL WORK SEND YOUR CV: sp@pratibhuti.com {NC260150}

COMPANY SECRETARY: REQUIRED URGENTLY PRACTISING COMPANY SECRETARY FOR MUMBAI BASED INVESTMENT (PVT. LTD) COMPANY HANDLING BASIC SECRETARIAL WORK SHARE YOUR CV: ideas1stresearch@gmail:com {NC260151}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC254675}

## सर्विसेस

दररोज ८०० टिफिन पोहोचवले जातात संपूर्ण मुंबईत. ६५ वर्ष किंवा त्यावरील वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत दुपारचे टिफिन पोहोचवले जातील. श्रीमती कुमुद हितेश चुनीलाल पोपटलाल गुटका प्रभादेवी- **9819006404** फक्त व्हॉट्सअॅप (फोन नाही) {NC260147}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260031}

## शेअर मार्केट

शेअर मार्केट शिका / रेफर करा / कमवा प्रत्यक्षात भेटा ठाणे- **9594060848** {NC254706}

**-: वाचकांना सूचना :-**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# बंगालमध्ये एमआयएम स्वबळावर लढणार! हुमायूं कबीरांशी युती संपुष्टात

■ कोलकाता

**असदुद्दीन** ओवैसी यांच्या एमआयएम पक्षाने हुमायूं कबीर यांच्या 'आम जनता उन्नयन पार्टी' पक्षासोबतची युती तोडण्याची घोषणा केली आहे. आता एमआयएम बंगालमध्ये स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

हा निर्णय हुमायूं कबीर यांच्या कथित व्हायरल व्हिडिओनंतर निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला आहे. एमआयएमने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर निवेदन जारी करत म्हटले की, कबीर यांच्या विधानांमुळे बंगालमधील मुस्लीम समाजाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा कोणत्याही वक्तव्याला पक्ष समर्थन देऊ शकत नाही. ज्यामुळे मुस्लीम समाजाच्या सन्मानावर परिणाम होतो. पक्षाने आपल्या निवेदनात पुढे म्हटले की, बंगालमधील मुस्लीम समाज हा देशातील सर्वात गरीब, उपेक्षित आणि शोषित घटकांपैकी एक आहे. अनेक वर्षांच्या धर्मनिरपेक्ष सत्तांनंतरही त्यांच्या स्थितीत सुधारणा झालेली नाही. त्यामुळे अशा समाजाला स्वतंत्र राजकीय आवाज मिळावा, ही एमआयएमची भूमिका असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. तसेच आगामी निवडणूक स्वबळावर लढवून पुढे कोणत्याही पक्षासोबत युती न करण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला. दरम्यान, गुरुवारी हुमायूं कबीर यांचा एक कथित व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर राज्यातील राजकारण तापले आहे.

# लखनौमध्ये दुबईहून येणाऱ्या विमानाचे आपत्कालीन लँडिंग

■ लखनौ

**दुबईहून** काठमांडूकडे निघालेल्या फ्लाय दुबईच्या विमानाचे आज सकाळी लखनौ विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. काठमांडूमध्ये खराब हवामानामुळे लँडिंगला परवानगी न मिळाल्याने हा निर्णय घेण्यात आला.

वैमानिकाने लखनौ एअर ट्रॅफिक कंट्रोलशी संपर्क साधून परवानगी घेतल्यानंतर सकाळी ८.२२ वाजताच्या सुमारास अमौसी विमानतळावर विमान सुरक्षित उतरवण्यात आले. एफजेड-११३३ या उड्डाणात १५४ प्रवासी होते. लँडिंगनंतर तांत्रिक पथकाने विमानाची तपासणी केली व इंधन भरल्यानंतर सुमारे दीड तासाने सकाळी १० वाजताच्या सुमारास विमान काठमांडूकडे रवाना झाले.

**देश विदेश**

# फ्रान्सची मायक्रोसॉफ्टच्या विंडोज सॉफ्टवेअरवर बंदी

■ पॅरिस

फ्रान्सने अमेरिकेला एक मोठा धक्का दिला. मॅक्रॉन सरकारने अमेरिकेच्या मायक्रोसॉफ्टपासून स्वतःला दूर केले. सरकारने या कंपनीचे सॉफ्टवेअर, मायक्रोसॉफ्ट विंडोज वापरण्यास नकार दिला आणि मायक्रोसॉफ्टच्या सर्व साधनांचा वापर बंद केला.

त्यांनी संपूर्ण सरकारी यंत्रणेला लिनक्सवर स्थलांतरित करण्याचा आदेश दिला. फ्रान्समधील मॅक्रॉन सरकारचा हा निर्णय तंत्रज्ञान जगतासाठी एक मोठा बदल म्हणून पाहिला जात आहे, ज्याची सुरुवात युरोप करत आहे. तंत्रज्ञान जगतामध्ये अशी चर्चा आहे की, फ्रान्सच्या सॉफ्टवेअर बदलाचा उद्देश डिजिटल जगात अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करणे हा आहे.

फ्रान्सला प्रवेश देऊन युरोपीय देशांना आपले नियंत्रण वाढवायचे आहे. मॅक्रॉन सरकारने असेही म्हटले

# पुण्यात महिलेचे शोषण सीईओसह ५ जणांवर गुन्हा

■ पुणे

**पुण्यातील** शिवाजीनगर परिसरातील एका खासगी वित्तीय संस्थेत काम करणाऱ्या महिलेचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ)सह पाच जणांविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

३३ वर्षीय पीडित महिला शिवाजीनगर येथील खासगी वित्तीय संस्थेत कार्यरत आहे. तिने आपल्या फिर्यादीत, कंपनीचे कार्यकारी संचालक स्वपन चक्रवर्ती यांच्यावर कामाच्या ठिकाणी वारंवार लगट करणे, जबरदस्तीने विनयभंग करणे आणि लैंगिक छळ केल्याचे गंभीर आरोप आहेत. पीडितेने तक्रार केल्यानंतर तिचे करिअर उद्ध्वस्त करण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

# धाराशिवमध्ये शिंदेंच्या दौऱ्यात नाराजी सावंत समर्थकांना नजरकैदेत ठेवले

■ धाराशिव

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांच्या धाराशिव दौऱ्यादरम्यान शिंदे गटात अंतर्गत नाराजी उफाळूनआली आहे. शिंदे खासगी कार्यक्रमासाठी शहरात दाखल होत असताना, माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या समर्थक अविनाश खापे पाटील आणि शिराढोणचे नितीन पाटील यांना पोलिसांनी नजरकैदेत ठवले. तसेच विमानतळावरही सावंत समर्थकांना शिंदे यांच्याजवळ जाण्यापासून रोखण्यात आल्याने वातावरण तापले.

धाराशिवमध्ये शिंदे गटात सावंत आणि त्यांच्या समर्थकांना बाजूला सारले जात असल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. यापूर्वी तानाजी सावंत हे धाराशिवचे पालकमंत्री होते. पण सध्या हे पद प्रताप सरनाईक यांच्याकडे गेल्याने सावंत समर्थकांमध्ये असंतोष वाढल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपासोबत जाण्याच्या निर्णयावरूनही मतभेद वाढले. शिंदे धाराशिवमध्ये येणार असल्याची माहिती मिळताच नाराज कार्यकर्ते त्यांना भेटून आपली भूमिका मांडण्याच्या तयारीत होते.

# आजचे राशी भविष्य

सोमवार ता. १३ एप्रिल २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | अनुकूल दिवस. लोकसंपर्कासाठी चांगला. नवीन मित्र जोडले जातील. इच्छापूर्तीचे समाधान लाभेल. |
| वृषभ | नवीन ओळखी होतील. भविष्यात याचा खूपच फायदा होईल. पैशाचा ओघ चांगला राहील. |
| मिथुन | नेहमीपेक्षा चांगला दिवस जाईल. आर्थिक प्रगती उत्साह वाढवेल. दानधर्मासाठी खर्च समाधान देईल. |
| कर्क | आत्मविश्वासाचा अभाव राहील. महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाकणे हिताचे ठरेल. आर्थिक हानी संभवते. |
| सिंह | अनुकूल दिवस. नवीन सहकारी आणि मित्र जोडले जातील. भावंडाशी सुसंवाद राहील. |
| कन्या | अनावश्यक चिंता टाळा. जोडीदाराबरोबर बेबनावाची शक्यता. संयम बाळगणे हिताचे ठरेल. |
| तूळ | उत्साही दिवस. मात्र घाईगर्दीत निर्णय घेणे टाळा. कौटुंबिक कलहाची शक्यता. |
| वृश्चिक | प्रतिकूल दिवस. विचारपूर्वक खर्च करा. कामाचे वाढते दडपण त्रस्तता वाढवेल. |
| धनु | भावनांवर ताबा ठेवणे गरजेचे राहील. भावंडे व अन्य निकटवर्तियांशी कलह संभवतो. तडजोड हिताची ठरेल. |
| मकर | दिवसाचा आलेख चढउताराचा राहील. कौटुंबिक सौख्याचा अभाव जाणवेल. आध्यात्मिक गोष्टी दिलासा देतील. |
| कुंभ | अनावश्यक चिंता टाळा. प्रयत्नांवर भर देणे हिताचे ठरेल. वडिलधाऱ्याशी मतभेद संभवतात. |
| मीन | फारशा घडामोडी नसलेला दिवस आहे. आत्मविश्वासाचा अभाव जाणवेल. सकारात्मक राहणे महत्त्वाचे ठरेल. |

## महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत वेळ 4:30 वाजता

सोडत वार रविवार • सोडत क्रमांक 15 • तिकीट कि. रु. 15/- • सोडत दिनांक 12/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MO-01 : 5040**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0023 | 0202 | 3262 | 3591 | 6508 | 6647 | 7750 | 8837 | 9039 | 9890 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0357 | 0458 | 5140 | 5759 | 6065 | 6580 | 6598 | 6826 | 8869 | 9244 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0831 | 2159 | 2309 | 3294 | 3950 | 4476 | 5590 | 6097 | 8659 | 8889 |

पाचवे बक्षिस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1539 | 2514 | 4321 | 5564 | 6684 | 7712 | 8845 | 9591 |
| | 1602 | 2629 | 4441 | 5733 | 6730 | 7716 | 8853 | 9665 |
| 0092 | 1694 | 2928 | 4444 | 5767 | 6760 | 7870 | 8860 | 9734 |
| 0335 | 1710 | 3127 | 4463 | 5935 | 6782 | 8300 | 8938 | 9796 |
| 0341 | 1722 | 3255 | 4474 | 5942 | 6836 | 8308 | 8978 | 9820 |
| 0402 | 2010 | 3329 | 4644 | 6006 | 6930 | 8454 | 9125 | 9839 |
| 0502 | 2116 | 3373 | 4746 | 6068 | 7174 | 8465 | 9127 | 9897 |
| 0655 | 2160 | 3538 | 4946 | 6136 | 7195 | 8600 | 9149 | 9898 |
| 1106 | 2180 | 3556 | 5085 | 6166 | 7207 | 8675 | 9195 | 9924 |
| 1117 | 2228 | 3743 | 5229 | 6195 | 7223 | 8691 | 9228 | 9957 |
| 1137 | 2242 | 3903 | 5239 | 6241 | 7286 | 8728 | 9249 | 9965 |
| 1166 | 2295 | 4086 | 5425 | 6245 | 7577 | 8760 | 9309 | 9991 |
| 1208 | 2464 | 4138 | 5553 | 6372 | 7707 | 8839 | 9359 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी

निकाल — सोडत वेळ 5:00 वाजता

सोडत वार रविवार • सोडत क्रमांक 15 • तिकीट कि. रु. 10/- • सोडत दिनांक 12/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-08 : 6254**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **4978** — श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

तिसरे बक्षिस रु. 2000/- : **7274**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1975 | 2372 | 3622 | 3810 | 6246 | 6755 | 7330 | 7797 | 9126 | 9725 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1211 | 3122 | 5019 | 5736 | 6099 | 6392 | 7530 | 8433 | 8591 | 9388 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0651 | 1617 | 2466 | 4552 | 6024 | 7196 | 7359 | 7415 | 8132 | 9430 |

सातवे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1529 | 2276 | 3136 | 3943 | 5251 | 6116 | 7279 | 7987 | 8718 |
| | | 1583 | 2279 | 3167 | 3963 | 5263 | 6160 | 7304 | 8053 | 8810 |
| | | 1612 | 2282 | 3173 | 4045 | 5269 | 6263 | 7329 | 8062 | 8837 |
| 0016 | 0878 | 1664 | 2315 | 3203 | 4048 | 5332 | 6363 | 7388 | 8217 | 8848 |
| 0045 | 0937 | 1677 | 2401 | 3230 | 4187 | 5378 | 6364 | 7408 | 8302 | 8849 |
| 0049 | 0990 | 1701 | 2412 | 3234 | 4199 | 5426 | 6367 | 7476 | 8369 | 8871 |
| 0050 | 1081 | 1713 | 2466 | 3317 | 4204 | 5455 | 6427 | 7486 | 8391 | 8893 |
| 0075 | 1097 | 1783 | 2478 | 3332 | 4444 | 5470 | 6474 | 7575 | 8463 | 8908 |
| 0093 | 1103 | 1806 | 2501 | 3353 | 4476 | 5500 | 6516 | 7657 | 8471 | 8989 |
| 0405 | 1115 | 1808 | 2505 | 3383 | 4480 | 5549 | 6593 | 7670 | 8525 | 9296 |
| 0410 | 1116 | 1810 | 2542 | 3407 | 4529 | 5559 | 6619 | 7702 | 8528 | 9329 |
| 0453 | 1118 | 1879 | 2621 | 3443 | 4790 | 5573 | 6631 | 7706 | 8563 | 9334 |
| 0460 | 1119 | 1881 | 2661 | 3559 | 4848 | 5595 | 6635 | 7756 | 8579 | 9345 |
| 0483 | 1144 | 2028 | 2665 | 3634 | 4884 | 5607 | 6662 | 7757 | 8590 | 9389 |
| 0537 | 1150 | 2124 | 2670 | 3639 | 4907 | 5708 | 6703 | 7768 | 8638 | 9461 |
| 0541 | 1158 | 2191 | 2680 | 3673 | 4914 | 5739 | 6887 | 7786 | 8646 | 9727 |
| 0592 | 1184 | 2224 | 2837 | 3690 | 4958 | 5784 | 6941 | 7799 | 8658 | 9785 |
| 0707 | 1227 | 2229 | 2928 | 3714 | 5130 | 5813 | 7017 | 7811 | 8683 | 9886 |
| 0717 | 1306 | 2237 | 2932 | 3735 | 5226 | 5904 | 7039 | 7857 | 8691 | 9887 |
| 0810 | 1312 | 2249 | 2952 | 3875 | 5233 | 5944 | 7202 | 7868 | 8702 | 9973 |
| 0822 | 1441 | 2254 | 3065 | 3931 | 5235 | 6000 | 7227 | 7876 | 8713 | 9976 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता.१३/४/२०२६

| | | |
|---|---|---|
| ६ | ० | ५ |
| ६२ | ०२ | ५२ |
| ६७ | ०७ | ५७ |
| ६३७ | २८० | १४० |
| ४५७ | १२७ | २३० |

# कांदिवलीत महायुतीत श्रेयवाद दोन दिवसांत दोनदा भूमिपूजन

■ मुंबई

**कांदिवली** पूर्वेतील लोखंडवाला-सिंह इस्टेट (म्हाडा परिसर) जोडणाऱ्या १२० फूट डीपी रस्त्याच्या कामावरून सत्ताधारी भाजपा आणि शिंदे गटातील आमदारांमध्ये श्रेयवाद चांगलाच रंगला आहे. एकाच प्रकल्पाचे दोन दिवसांत दोनदा भूमिपूजन झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. भाजपा आमदार अतुल भातखळकर यांनी या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन केले. त्याआधीच मागाठाणे विधानसभा मतदारसंघाचे शिंदे गटाचे आमदार प्रकाश सुर्वे यांनीही याच १२० फूट डीपी रोडचे भूमिपूजन केले होते. त्यामुळे एकाच कामाचे दोन वेगवेगळ्या आमदारांकडून भूमिपूजन झाल्याने श्रेय घेण्याची स्पर्धा उघड झाली आहे. कांदिवली पूर्व लोखंडवाला येथून ठाकूर गावाकडे जाणाऱ्या या महत्त्वाच्या रस्त्याला मंजुरी मिळाल्यानंतर दोन्ही गटांकडून आपापल्या पद्धतीने बॅनरबाजी करण्यात आली. प्रकल्पाचे श्रेय स्वतःकडे खेचण्यासाठी दोन्ही आमदारांच्या समर्थकांकडून मोठ्या प्रमाणावर पोस्टर आणि बॅनर लावण्यात आले आहेत.

# महानिर्मितीच्या गारे पालमा खाणीतून पहिला कोळसा रॅक प्राप्त झाला

■ नागपूर



**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून महानिर्मितीच्या मालकीच्या छत्तीसगड येथील गारे पालमा खाणीतून प्राप्त पहिल्या कोळसा रॅकचे आज उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

महानिर्मितीच्या मालकीच्या कोळसा खाणीमधून दर्जेदार कोळसा प्राप्त झाल्याने महानिर्मितीच्या इंधन सुरक्षेस बळकटी मिळणार असल्याचे तसेच याचा फायदा राज्यातील वीज ग्राहकांना होणार असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले. ही कोळसा खाण महानिर्मितीला प्राप्त करून दिल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्याच्या वतीने आभार मानले. महसूल मंत्री तसेच नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे यात उल्लेखनीय योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. याचवेळी कोरडी औष्णिक विद्युत केंद्र येथे २ ६६० मेगावॅट क्षमतेच्या अत्याधुनिक सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावर आधारित बदली प्रकल्पाच्या मुख्य नियंत्रण कक्ष इमारतीचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि महानिर्मितीचे अध्यक्ष व वव्यस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. तसेच जिल्हाधिकारी (नागपूर) कुमार आशीर्वाद , महानिर्मितीचे स्वतंत्र संचालक. विश्वास पाठक यांचे हस्ते करण्यात आले.

## लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत वेळ 4:45 वाजता

सोडत वार रविवार • सोडत क्रमांक 15 • तिकीट कि. रु. 20/- • सोडत दिनांक 12/04/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-01 : 3544** — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2852 | 4188 | 4406 | 5430 | 7016 | 7092 | 8087 | 8136 | 8263 | 9651 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0831 | 2542 | 3101 | 4390 | 5237 | 5264 | 6760 | 7912 | 8840 | 9645 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0234 | 0535 | 1612 | 1977 | 2207 | 4043 | 4529 | 6320 | 6864 | 7017 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1026 | 3819 | 4462 | 5224 | 5724 | 6018 | 6221 | 7163 | 9701 | 9876 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 100/- | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1228 | 2131 | 3104 | 3739 | 4720 | 5305 | 6291 | 7297 | 8380 | 9154 |
| | | 1304 | 2156 | 3124 | 3756 | 4724 | 5357 | 6375 | 7417 | 8400 | 9177 |
| 0019 | 0690 | 1353 | 2172 | 3151 | 3815 | 4726 | 5404 | 6425 | 7467 | 8540 | 9236 |
| 0053 | 0694 | 1371 | 2211 | 3199 | 3853 | 4841 | 5424 | 6548 | 7517 | 8585 | 9290 |
| 0057 | 0728 | 1410 | 2218 | 3232 | 3898 | 4910 | 5458 | 6573 | 7550 | 8591 | 9296 |
| 0058 | 0760 | 1411 | 2224 | 3252 | 3920 | 4919 | 5465 | 6641 | 7565 | 8602 | 9453 |
| 0150 | 0793 | 1415 | 2234 | 3259 | 3931 | 4942 | 5515 | 6736 | 7570 | 8625 | 9499 |
| 0190 | 0896 | 1430 | 2262 | 3303 | 3936 | 4944 | 5526 | 6786 | 7608 | 8650 | 9523 |
| 0191 | 0919 | 1444 | 2289 | 3338 | 3946 | 4951 | 5529 | 6800 | 7732 | 8680 | 9535 |
| 0236 | 0950 | 1447 | 2437 | 3339 | 4032 | 4976 | 5542 | 6924 | 7779 | 8799 | 9540 |
| 0349 | 0982 | 1572 | 2438 | 3356 | 4035 | 4985 | 5627 | 6980 | 7789 | 8806 | 9544 |
| 0370 | 0985 | 1630 | 2442 | 3360 | 4114 | 5015 | 5649 | 7071 | 7806 | 8822 | 9581 |
| 0435 | 1019 | 1686 | 2475 | 3379 | 4115 | 5056 | 5656 | 7072 | 7893 | 8851 | 9617 |
| 0460 | 1071 | 1687 | 2547 | 3386 | 4134 | 5075 | 5815 | 7074 | 7963 | 8888 | 9649 |
| 0490 | 1104 | 1770 | 2693 | 3387 | 4141 | 5078 | 5872 | 7088 | 7993 | 8892 | 9675 |
| 0511 | 1127 | 1818 | 2694 | 3404 | 4142 | 5103 | 5889 | 7095 | 8016 | 8948 | 9687 |
| 0554 | 1139 | 1844 | 2712 | 3415 | 4246 | 5106 | 5909 | 7144 | 8023 | 8965 | 9819 |
| 0586 | 1141 | 1850 | 2725 | 3434 | 4298 | 5217 | 5945 | 7191 | 8038 | 9005 | 9899 |
| 0603 | 1148 | 1868 | 2728 | 3453 | 4409 | 5222 | 6069 | 7192 | 8047 | 9024 | 9902 |
| 0630 | 1151 | 1915 | 2774 | 3480 | 4440 | 5241 | 6169 | 7211 | 8083 | 9039 | 9912 |
| 0672 | 1177 | 2002 | 2812 | 3499 | 4494 | 5281 | 6261 | 7237 | 8238 | 9122 | 9922 |
| 0681 | 1219 | 2077 | 2822 | 3640 | 4558 | 5295 | 6275 | 7290 | 8247 | 9147 | 9978 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# आधी २३.८९ कोटी रुपये भरा! तरच पाणीपुरवठा पूर्ववत होणार

■ मुंबई

**उच्च** न्यायालयाने सहारा स्टार हॉटेलला थकीत मालमत्ता करापोटी २३.८९ कोटी रुपये न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिले आहेत. चार आठवड्यांत ही रक्कम भरली तरच या हॉटेलचा पाणीपुरवठा पुन्हा सुरू करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. मात्र हॉटेलच्या मालमत्ता जप्तीच्या कारवाईला तात्पुरती स्थगिती दिली आहे.

उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.सहारा स्टार हॉटेलने मालमत्ता करापोटी २३.८९ कोटी रुपये थकवले. त्यामुळे पालिकेने या हॉटेलचा पाणीपुरवठा बंद केला आहे. पालिकेच्या या कारवाई विरोधात हॉटेल व्यवस्थापनाने उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. या खटल्याची सुनावणी चार दिवसांपूर्वी झाली. यावेळी न्यायालयाने या हॉटेलची

**मुंबई उच्च न्यायालयाचे 'सहारा स्टार'ला आदेश**

अलिकडची आर्थिक स्थिती पाहून हॉटेलला २३.८९ कोटी मालमत्ता थकबाकी भरण्यास चार महिन्यांची मुदत दिली आहे. मुदतीत पैसे भरले तरच पाणीपुरवठा पूर्ववत करण्याचे आदेश पालिकेला दिले. मात्र जप्ती कारवाईसाठी पालिकेने बजावलेल्या पाच नोटिसांना मात्र स्थगिती दिली. हॉटेलच्यावतीने ज्येष्ठ वकील चेतन कपाडिया यांनी बाजू मांडली.















## अमर आशा









# स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांचे निधन

पान १ वरून

अलौकिक, अद्‌भूत आवाजाची जन्मजात देणगी मिळाली. त्यांना गायनाचा वारसा घरातूनच मिळाला. आशा यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीत झाला. त्या ९ वर्षांच्या असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्यांनी बहीण लता मंगेशकर यांच्यासोबत कुटुंबाला आधार देण्यासाठी गायनाला सुरुवात केली. तेव्हापासून त्यांचा सूर कधी थांबलाच नाही. १९४३ साली आलेल्या 'माझा बाळ' या मराठी चित्रपटासाठी आशा यांनी 'चला चला नव बाला' हे पहिले गाणे गायले होते. तर १९४८ साली 'चुनरिया' या चित्रपटात त्यांनी 'सावन आया...' हे पहिले हिंदी गाणे गायले. त्यानंतर १९४९ मधील 'रात की रानी' या चित्रपटात त्यांनी पहिले सोलो गाणे गायले. १९५३ साली 'परिणीता' या चित्रपटातील गाण्यांनंतर त्यांना खरी ओळख मिळू लागली. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. आशा यांच्या कारकिर्दीत ओ. पी. नय्यर यांचा वाटा सर्वाधिक राहिला. त्यांनी तब्बल ५३ चित्रपटांत आशा यांना गाण्याची सधी दिली.

आशा यांनी आपल्या कारकिर्दीत १२,००० गाणी गायली. ही गाणी २० वेगवेगळ्या भाषांतील आहेत. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌समध्ये झाली आहे. ८० वर्षांच्या काळात सिनेसृष्टी बदलली. संगीत बदलले. संगीतकार बदलले. सिनेमाच्या नायक-नायिका बदलल्या. पण आशा यांचा आवाज कधीच कालबाह्य, जुना झाला नाही. तो ताजाच राहिला. वैजयंतीमाला, पद्मिनीपासून माधुरी दीक्षित, उर्मिला मातोंडकरपर्यंत सगळ्यांना आशा ताईंनी आवाज दिला. ओ. पी. नय्यरपासून ए. आर. रहेमानपर्यंत संगीतकारांची वेगवेगळ्या प्रकारची गाणी त्यांनी लिलया गायली. या काळात क्वचितच एखादा संगीतकार असावा, ज्याच्यासाठी आशा यांनी काम केले नसेल. हिंदीत 'मेरा कुछ सामान...'पासून 'मोनिका ओ माय डार्लिंग...' आणि मराठीत 'केव्हा तरी पहाटे...' पासून 'बुगडी माझी सांडली ग...'पर्यंत आशा यांच्या गायनाची रेंज अफाट आहे. उडती, खट्याळ, बोल्ड, मधाळ, पाश्चात्य धाटणीची, कॅब्रे गाणी त्यांनी गायली. (त्यातून त्यांनी दम मारो दमसारखे गाणेही गायले) तेवढ्याच सहजतेने कव्वाली, भजन असो वा भांगडा, नाट्यगीत, भावगीतेही गायली. इतकी वैविध्यपूर्ण गाणी गाणारी दुसरी गायिका नसेल. त्यांच्या गंभीर गीतांची यादी केली तर तीही खूप मोठी होईल. मराठी भावगीतांच्या बाबतीत तर आशा भोसले यांनी केलेली कामगिरी अविस्मरणीय म्हणावी लागेल. मराठी भावगीतात लता-पी सावळाराम-वसंत प्रभू ही त्रयी रसिकांना नवनवीन नजराणे पेश करत असताना आशा-गदिमा-सुधीर फडके ही दुसरी त्रयी मनोहारी शब्द-स्वर व सुरांचे अनोखे भावविश्व उभे करत होती. 'तुला पाहते रे तुला पाहते, जरी आंधळी मी तुला पाहते...', 'विकत घेतला श्याम..' , 'का रे दुरावा का रे अबोला...', 'फिरूनी नवी जन्मेन मी...', 'तुझ्या माझ्या संसाराला...', 'फिटे अंधाराचे जाळे...' यासारख्या गाण्यांतून त्यांच्या गायकीचे सर्व रस दिसतात.

आशा आणि लता मंगेशकर या दोघींची कारकीर्द समांतरपणे चालत राहिली. त्यामुळे त्यांची तुलना कायम होत राहिली. लता आणि आशा यांच्यात सर्वोत्कृष्ट गायिका कोण हा प्रश्न उपस्थित केला गेला. त्यांच्यातील छुप्या स्पर्धेचीही कायम चर्चा होत राहिली. खरे तर दोघी आपापल्या साम्राज्याच्या सम्राज्ञी होत्या. आपल्यात संघर्ष आहे, असे दोघींनी कधीच मान्य केले नाही. हा संघर्ष कधीच उघड झाला नाही. तो छुपाच राहिला. (त्यांच्या संघर्षावर 'साज' नावाचा हिंदी चित्रपट आला होता.) याबाबत विचारले असता आशा म्हणाल्या की, एका झाडाच्या छायेत दुसरे झाड रुजत नाही. त्यामुळे एका झाडाने वेगळे व्हायला हवे. त्याप्रमाणे मी वेगळी झाले. आमच्या नात्यात संघर्ष कधीच नव्हता. पण तो गाण्यात होता. संघर्ष लोकांनी निर्माण केला. आशा चांगली की लता चांगली, हे लोक तराजूत तोलायचे. दीदीने तिच्या शैलीला साजेशी शांत, संस्कारी, निर्मळ गाणी गायली. मी दुसरे टोक घेऊन गात राहिले. मी मला साजेशी अवखळ गाणी गायली. मी कुठले गाणे गायचे, याचे बंधन ठेवले नाही. आम्ही दोघांनी एके काळी राज्य केले.

आशा यांचे खासगी आयुष्य वादळी राहिले आहे. १६ वर्षांच्या असताना मोठी बहीण लता यांचे ३१ वर्षांचे सेक्रेटरी गणपतराव भोसले यांच्यासोबत त्यांनी पळून जाऊन लग्न केले. गणपतराव वयाने त्यांच्यापेक्षा १५ वर्षांनी मोठे होते. मंगेशकर कुटुंबाला त्यांचा हा निर्णय आवडला नाही. त्यांनी आशा यांच्याशी बराच काळ बोलणे बंद केले होते. पुढे हा निर्णय आशा यांच्यासाठीही आनंदापेक्षा जास्त दुःख घेऊन आला. लग्नानंतर त्यांना पती आणि सासरच्यांकडून चांगली वागणूक मिळाली नाही. कटुता वाढत गेली. गणपतराव यांनी त्यांना घरातून काढून टाकले. त्यावेळी आशा तिसऱ्या मुलाची आई होणार होत्या. नाईलाजाने त्यांना आपल्या माहेरी परतावे लागले. १९६० साली आशा आपल्या पहिल्या पतीपासून विभक्त झाल्या. त्यानंतर आशा भोसले यांनी संगीतकार आर. डी. बर्मन यांच्याशी प्रेमविवाह केला. 'तिसरी मंझिल' (१९६६) नंतर एकत्र काम करत असताना झालेली त्यांची मैत्री हळूहळू प्रेमात रुपांतरित झाली. मात्र आशा भोसले यांनी आपले भोसले आडनाव कायम ठेवले. १९९४ साली बर्मन यांचे निधन झाले.

आशा यांनी वैयक्तिक जीवनात अनेक दुःख पचवली. त्यांचा मोठा मुलगा हेमंत भोसले याने सुरुवातीला पायलट म्हणून काम केले. नंतर त्यांनी संगीत क्षेत्रात पाऊल ठेवले. त्यांनी काही अविस्मरणीय गाणीही दिली. मात्र २०१५ मध्ये कर्करोगाने त्यांचे निधन झाले. आशा यांची मुलगी वर्षा भोसले, एक प्रसिद्ध स्तंभलेखिका होती. पतीपासून घटस्फोट घेतल्यानंतर त्यांनी ५५ व्या वर्षी गोळी झाडून आत्महत्या केली. त्यांचा सर्वात धाकटा मुलगा आनंद भोसले हे आईचा व्यवसाय आणि करिअरची जबाबदारी सांभाळतात.

या सगळ्या दुःखद घटनांना आशा धिरोदात्तपणे सामोऱ्या गेल्या. गायन क्षेत्रातच नव्हे तर हॉटेल व्यवसायातही त्यांनी नाव कमावले. त्यांनी दुबईत आशा नावाने रेस्टॉरंट सुरू केले होते. वयाची नवद्दी उलटली तरी त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य कायम होते. त्यांच्या आवाजातील तरुणपणा जगण्यातही उतरला होता. आपल्या चिरतरुणपणाचे रहस्य काय असे विचारल्यावर त्या एवढेच म्हणत की, वय वाढले तरीही मी मनाने तरुण आहे. ९० व्या वर्षीही उभी आहे, गाते आहे. पण याबाबत मी इतकेच म्हणेन की देव आपल्याकडून हे सगळे काही करून घेतो.

## आशा भोसले यांना मिळालेले पुरस्कार

- १९९७ मध्ये गानसाम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार.
- २००० मध्ये दादासाहेब फाळके पुरस्कार
- २००८ रोजी पद्मविभूषण पुरस्कार
- २०११ गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद
- २०२० महाराष्ट्र भूषण.
- सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार.
- दोन वेळा राष्ट्रीय पुरस्कार

## आशा भोसलेंच्या आठवणीत तब्बू भावुक! गिटार भेटीचा किस्सा शेअर

मुंबई

**दिग्गज** गायिका आशा भोसले यांच्या निधनानंतर संपूर्ण चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली असून, अनेक कलाकार त्यांच्या आठवणींना उजाळा देत आहेत. अभिनेत्री तब्बू हिने आशाताईंशी संबंधित एक खास आठवण शेअर करत भावनिक पोस्ट केली आहे.

तब्बूने आशा भोसले यांच्यासोबतचे काही फोटो शेअर करत त्यांच्याकडून मिळालेल्या अनमोल भेटीची आठवण सांगितली. आपल्या वाढदिवसानिमित्त आशाताईंनी दिलेल्या गिटारची आठवण करत तब्बूने कृतज्ञता व्यक्त केली आहे. तब्बू आपल्या पोस्टमध्ये

म्हणाली की, माझ्या आयुष्यातील काही अविस्मरणीय क्षणांबद्दल सांगायचे आहे. असा क्षण, जो मी कधीच विसरणार



नाही. नोव्हेंबरमध्ये माझा वाढदिवस होता आणि अचानक मला ही सुंदर भेट मिळाली. गिटार ...आशाजींनी दिलेली ही प्रेमळ भेट माझ्यासाठी खूप मौल्यवान आहे. आशाजी, मला तुमच्यावर किती प्रेम आहे आणि तुमच्याबद्दल किती आदर आहे, हे शब्दांत मांडणे कठीण आहे.


## मान्यवरांची श्रद्धांजली



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारतातील सर्वात ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसलेजी यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला.



गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, आशाताईंनी आपल्या मधुर आवाजाने एक वेगळी ओळख निर्माण केली नाही, तर भारतीय संगीतसृष्टीला समृद्ध करण्यामध्ये मोलाचे योगदान दिले. त्यांच्या सुमधुर गीतांनी पिढ्यान्‌पिढ्या रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. संगीताच्या प्रत्येक प्रकारात स्वतःला सहज जुळवून घेण्याची त्यांची अद्वितीय क्षमता विलक्षण होती.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील भावना व्यक्त केल्या आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मंगेशकर कुटुंबातील दुसरा तारा आशा भोसले यांचे निधन झाले आहे. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी संगीताची सेवा केली. आशाताईंचे व्यक्तीमत्व जिंदादिल होते. आशाताईंची शंभरी करण्याची संधी काळाने दिली नाही.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, आशा भोसले यांनी भारतीय संगिताला जगात पोहोचवले. आशाताईंनी अनेक भाषांमध्ये गाणी गायली. त्यांचे आणि माझे जवळचे संबंध होते. माझ्या ६१ व्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात आल्या होत्या. गीत म्हणून त्यांनी मला आशीर्वाद दिले.



उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले की, भारतीय संगीत विश्वातील एक अमर आवाज आज शांत झाला. त्यांच्या स्वरांनी अनेक पिढ्यांना आनंद दिला. त्या एक दिलखुलास व्यक्तिमत्त्व होते. लतादीदी यांच्यानंतर त्या संगीत क्षेत्रातील एका महान पर्वाच्या स्तंभाप्रमाणे उभ्या होत्या.



ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले की, आशाताईंच्या रूपाने भारतीय संगीतविश्वातील अजरामर आवाज हरपला आहे. हिंदीसह मराठी, बंगाली, गुजराती, पंजाबी आणि अनेक भाषांमध्ये हजारो गाणी गाऊन तब्बल सहा दशकांहून अधिक काळ त्यांनी भारतीय संगीतविश्वासाठी दिलेले योगदान अमूल्य आहे.



माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर म्हणाले की, गाणे असो वा साधा संवाद, आशाताईंना ऐकणे नेहमीच जादुई असते. त्यांची टायमिंगची जाण अप्रतिम आहे आणि विनोदबुद्धीही विलक्षण आहे. आशाताई, तुम्ही जिथे जाल तिथे नेहमी आनंद पसरवत राहा.



लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी म्हणाले की, आशा भोसले यांची कला त्यांच्या आवाजातून आपल्या सर्वांच्या हृदयात सदैव अमर राहील. या दुःखद प्रसंगी, त्यांच्या शोकाकुल कुटुंबीय आणि चाहत्यांप्रती माझ्या संवेदना आहेत.



राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की, एक प्रतिष्ठित गायिका म्हणून आपल्या उज्ज्वल कारकिर्दीतून आशा भोसले यांनी भारतीय संगीताच्या नव्या युगाची सुरुवात केली. आपल्या मधुर आणि सदाबहार आवाजाने त्यांनी अनेक दशकांपासून भारतीय संगीत समृद्ध केले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, देशाने एक महान स्वरसम्राज्ञी गमावली आहे. आशाताई गेल्यामुळे महाराष्ट्रातल्या घराघरातल्या प्रत्येकाला कोणीतरी आपल्या परिवाराचा सदस्य गमावल्याचे दुःख आज होत आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# स्वरसाम्राज्याच्या सूरसम्राज्ञी आशाताई

शब्दांमधून संवेदना व्यक्त करण्याचे काम गीतकार किंवा कवी करू शकतो. परंतु त्या शब्दांना माधुर्य आणि खरं तर शब्दांनाही अजरामर करण्याचे काम हे गायकांकडून होत असते. जगातली सर्वाधिक गाणी गाण्याचं भाग्य लाभलेल्या आणि हजारो गाण्यांना अजरामर करून सूरसम्राज्ञी म्हणून अमर ठरलेल्या आशाताईंनी आपली इहलोकीची यात्रा संपवली आहे. आज सृष्टीमध्ये वसंत खूप बहरलेला असताना आशाताईंनी अचानकपणे अनंताकडे सुरू केलेला प्रवास अधिक चटका लावणारा ठरतो. वसंत ऋतूलाच 'ऋतू हिरवा' म्हणून ओळखले जाते आणि आशाताईंचा 'ऋतु हिरवा' हा अल्बमसुद्धा प्रचंड गाजला होता. आपल्या विविध भाषिक आणि सर्व प्रकारच्या गाण्यांमधून स्वरबहार किंबहुना सूरसम्राज्ञी म्हणूनच त्यांनी या संगीत साम्राज्याची मनोमन अनुभूती घेतली. दोन वर्षांपूर्वी लताबाई गेल्या आणि पाठोपाठ आता वयाच्या ९३ व्या वर्षी आशाताईंनी घेतलेला हा निरोप म्हणजे एकूणच भारतीय संगीत क्षेत्रात निर्माण झालेल्या पोकळीत आणखीनच भर पडलेली आहे. भारतीय संगीत विश्वाची प्रभावी ओळख ज्यांच्यामुळे टिकून आहे त्या मंगेशकर कुटुंबातल्या या दुसऱ्या सदस्याचे निघून जाणे म्हणजे या तेजोमय गगन सदनातून आणखी एक तारा निखळण्यासारखे आहे. कोणतंही गाणं घेतलं की, आशाताईंच्या स्वराबरोबरच त्या गाण्यातून स्वभाव व्यक्त करण्याची अनोखी हातोटी आशाताईंकडे होती. मग ती भावगीतं असतील, भक्तीगीतं असतील किंवा प्रणयआधारित प्रेमगीतं असतील यातून शब्दांमधले भावमाधुर्य आशाताईंच्या इतक्या प्रभावीपणे कोणीही व्यक्त करू शकलेले नाही. गाणं हे रसिकांना ऐकण्याचा आनंद देतो, पण हे गाणं अधिकाधिक ऐकलं जाण्याची किमया गायकाला करावी लागते. आणि त्यासाठी गाणं गाता गाताच त्याचं खूप नवीननवीन शिकणं सुरू असतं. असं म्हणतात की, गाण्यांच्या विविधतेतला चमत्कार फक्त आशाताईंच्या गळ्यातूनच अनुभवता येतो. याचं कारण म्हणजे अगदी वयाच्या ९०पर्यंत त्याचं हे गाणं शिकणं आणि त्या गाण्यातून एक नवं विश्व अनुभवणं ही प्रक्रिया अखंडपणे सुरू होती.

**मनात घर करणारा स्वर**

ज्या आशाबाईंनी त्यांना मिळालेल्या प्रत्येक संधीच्या क्षणांना विलक्षण करण्याची करामत करून दाखवली. मराठी भाषेचा स्वरांमधला हा साजशृंगार मराठी रसिकांना मनसोक्त अनुभवण्याची पर्वणी केवळ आशाबाईंमुळे प्राप्त झाली. लताबाई किंवा आशाबाई यांच्यामध्ये तुलनाच होऊ शकत नाही. कारण दोघींनीही या संगीतमय दुनियेला स्वतःच्या स्वरांमधून वेगळी ओळख निर्माण करून दिली. आशाबाईंचं 'धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना, शब्दरूप आले मुक्या भावनांना' म्हणजेच आपल्या स्वरांमधून खऱ्या अर्थाने मुक्या भावनांना शब्दरूप करण्याची हीच ती विलक्षण शैली आशाबाईंकडे होती. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांचा संगीत क्षेत्रातला प्रवेश म्हणजे 'नाच रे मोरा आंब्याच्या वनात नाच रे मोरा।' या गाण्याबरोबर ऐकणाऱ्याच्या मनालाही नाचायला लावण्याची प्रभावी शक्ती त्यामध्ये होती. भावगीतांमधूनसुद्धा अजी मी ब्रह्म पाहिले, गिरीधरापुढे या नाचिन मी, जयशारदे वागिश्वरी, देव जरी मज कधी भेटला किंवा नको रे नंदलाला, यासारखी गीतं म्हणजे संध्यासमयी देव्हाऱ्यात मंदपणे तेवणारा स्वरआशादीपच म्हणावा लागतो. जा बाळे जा सुखे सासरी, जाशील कोठे मुली तू, जीवलगा राहिले रे दूर घर माझे, आज कुणीतरी यावे, आज प्रीतीला पंख हे, किंवा आठवणींनो उघडा डोळे असे आर्त स्वरांमधून प्रेमकाव्यातली रसिकता, आगतिकता किंवा विरहता, आशाबाईंच्या वैविध्यपूर्ण चालींमधूनच अनुभवता येते. सुधीर फडके असतील. यशवंत देव असतील. अशा मराठीतल्या वरिष्ठ ज्येष्ठ संगीतकारांशी त्यांचं एक वेगळं नातं होतं. आणि अशी अनेक गीतं जी केवळ आशाबाईच गाऊ शकतील. किंवा त्या स्वरांना आशाबाईच न्याय देऊ शकतील याची खात्री असल्याने त्यांच्याकडूनच ती गाणी पूर्ण करून घेण्याचा हट्ट या संगीतकारांचा असायचा. एकदा आशाबाईंकडे गाणं सोपवलं की, त्याचं सोनं होणार याचीदेखील त्यांना हमी वाटत असे. आणि असं तावुन सुलाखून आशाबाईंच्या गळ्यातून बाहेर पडणारा स्वर रसिकांच्या मनात कायमस्वरूपी घर करून राहायचा.

**हिंदी चित्रपटसृष्टीची ओळख**

भारत हा सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे. पण याच सर्वाधिक भाषेतली सर्वाधिक गाणी गाणारी एकमेव स्वरराणी ठरते. भारताची हिंदी चित्रपटसृष्टी ही त्यातल्या कथानकांपेक्षाही खरंतर त्यातल्या गाण्यांमुळेसुद्धा लोकप्रिय झालेली आहे आणि या हिंदी चित्रपटसृष्टीतली सर्वाधिक आणि खूप विविध पद्धतीची गाणी आशाबाईंनी गायली. मग कॅब्रे असेल, पॉप असेल, गझल असेल किंवा हिंदीतली सगळी प्रेमगीतं असतील. त्यातही अनेक प्रकारच्या जुगलगीतांसाठी आशाताईंचा स्वर हा सर्वाधिक सुयोग्य स्वर मानला जात असे. थोड्या वेगळ्या शब्दांत सांगायचे तर हिंदी चित्रपटसृष्टीला आशाबाईंच्या गाण्यांमुळे एक वेगळी लोकप्रियता मिळावी हे नाकारून चालणार नाही. म्हणूनच सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आशाबाई आपल्या या स्वरमाधुर्यातून अजरामर तर झाल्या आहेतच. परंतु शब्दांना अनेक गीतकारांना अजरामर करण्याचे कामही त्यांच्या गायनशैलीतून होऊ शकले. वयाच्या साठाव्या वर्षांनंतर त्यांनी 'जवाने जानेमन हसिन दिलरूबा', यासारखी अतिशय वेगळ्या स्वरूपाची गाणी गाऊन रसिकांना आश्चर्यचकित केलं होतं. ए. आर. रहेमान यांच्यासारख्या तरुण संगीतकाराबरोबर रंगीला चित्रपटासाठी, त्यांना गायिलेलं रंगीला रे, या गीताने त्यांच्या स्वरांचा एक वेगळाच रंग साकार केला होता. अशा या स्वरदुनियेची वेगळीच सफर घडवून आणणारी ही गायिका कोणत्याही चौकटीत अडकलेल नाही. त्यांच्या व्यक्तीगत जीवनामध्ये अनेक प्रकारची दुःख त्यांनी पचवली. मात्र परिस्थितीला वश न होता नवी आशा जागवण्याचे काम त्यांनी सातत्याने केले म्हणूनच त्या आयुष्यात आशादायी राहिल्या.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

मदतीला आलेला हात हा कधी जातीचा, धर्माचा नसतो.
तर तो माणुसकीचा असतो.

## पंचांग

**सोमवार १३ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** चैत्र कृष्ण एकादशी * नक्षत्र - धनिष्ठा**

**रवी उदय- ०६-२४, रवी अस्त- १८-५४**

**जन्मराशी :-**
**००-०१ ते ०३-४४ मकर**
**०३-४५ ते २४-०० कुंभ**

**वरुथिनी एकादशी, श्रीवल्लभाचार्य जयंती, जालियनवाला बाग स्मृतिदन; गोरक्षनाथ यात्रा-बत्तीस शिराळे**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)



## पाककृती

## गव्हाच्या कुरडया




★**साहित्य :** १ किलो गहू, चवीनुसार मीठ, थोडं तेल, २ चमचा कुटलेले जिरे (ऐच्छिक).

★**कृतीः-** १ किलो गहू तीन दिवस पाण्यात भिजत ठेवावे. दररोज पाण्यात बदल करावा. भिजवलेले गहू गिरणीतून किंवा मिक्सरमधून थोडे इंचरवर फिरवून घेऊन त्याचे मिश्रण तयार करावे. हे मिश्रण हाताने दाबून त्यातील चीक दोन पाण्यात काढून घ्यावा. नंतर ते पाणी गाळणीने गाळून, तलम कपड्याने पुन्हा छान गाळून घ्यावे. हे पाणी एका भांड्यात झाकून ठेवावे. रात्रीभर ठेवून



सकाळी वरचे पाणी अलगद काढून टाकावे. खाली जी खडी तयार झाली असेल, तीच चीक. गॅसवर एका पातेल्याला थोडासा तेलाचा हात लावून त्यात चीक व थोडेच पाणी घालावे. उकळी आल्यावर चवीनुसार मीठ टाकावे. गॅस स्लो करून, एका हाताने चीकाची धार धरावी व दुसऱ्या हाताने लाटण्याने किंवा घोट्याने सतत ढवळावे. मिश्रण एकजीव झाल्यावर त्यावर ओला पंचा घालून झाकण ठेवावे. साधारण १० मिनिटे वाफ येऊ द्यावी. मध्ये-मध्ये हलवणे आवश्यक आहे. तयार मिश्रणातून कुरडया पिठात ओतून साच्यावर घालाव्यात. त्या उन्हात चांगल्या वाळू द्याव्यात. वाळलेल्या कुरडया तेलात तळाव्यात. या कुरडया खूपच हलक्या आणि डबल फुगणाऱ्या होतात.




# गुजरातने लखनौला ७ गडी राखून नमवले

**सलामीवीर शुभमन गिल (६०) आणि जोस बटलर (५६) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर गुजरात टायटन्सने लखनौ सुपर जायंट्सचा ७ गडी राखून पराभव केला. लखनौच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या १९ व्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना लखनौने २० षटकांत ८ गडी गमावून १६४ धावा केल्या. या प्रत्युत्तरात गुजरातने १८.४ षटकांत ३ गडी गमावून १६५ धावा करून या हंगामातील दुसरा विजय मिळवला. तर लखनौचा हा दुसरा पराभव आहे.**



**गिल आणि बटलरची अर्धशतकी खेळी**

■ लखनौ

**गुजरातने** नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. लखनौची फलंदाजी खराब झाली आणि त्यांच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. प्रसिद्ध कृष्णा आणि मोहम्मद सिराज यांच्या नेतृत्वाखालील वेगवान गोलंदाजांच्या शानदार कामगिरीमुळे गुजरातने लखनौला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखले. लखनौकडून एडन मार्करामने सर्वाधिक ३० धावा केल्या. इतर कोणताही फलंदाज २० धावांचा टप्पा गाठू शकला नाही. कर्णधार ऋषभ पंत (१८), निकोलस पूरन (१९), अब्दुल समद (१८) आणि मुकुल चौधरी (१८) हे फलंदाज स्थिरावल्यानंतर बाद झाल्याने लखनौने गुजरातसमोर विजयासाठी १६४ धावांचे लक्ष्य दिले.

या धावसंख्येचा पाठलाग करताना गिल आणि साई सुदर्शन यांनी गुजरातला भक्कम सुरुवात करून दिली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ५ षटकांत ४५ धावा जोडल्या. पॉवरप्ले संपण्यापूर्वी दिग्वेश सिंग राठीने सुदर्शनला बाद करून ही भागीदारी संपुष्टात आणली. सुदर्शनने ३ चौकारांसह १४ चेंडूंमध्ये १५ धावा केल्या. त्यानंतर गिलने बटलरसोबत सूत्रे हाती घेत दुसऱ्या विकेटसाठी ८४ धावांची भागीदारी करून विजयाचा पाया रचला. प्रिन्स यादवने गिलला बाद करून गुजरातला आणखी एक धक्का दिला. गिलने ४० चेंडूंमध्ये ५६ धावा केल्या होत्या. त्यानंतर लगेचच मोहम्मद शमीने बटलरला बाद केले. बटलरने ११ चौकारांसह ३७ चेंडूंमध्ये ६० धावा केल्या होत्या. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदर (नाबाद २१) आणि राहुल तेवतिया (नाबाद १०) यांनी १८.४ षटकांत गुजरातचा विजय निश्चित केला. २८ धावांत ४ गडी बाद करणारा गुजरातचा वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

# आज हैदराबादसमोर राजस्थानच्या वैभव सूर्यवंशीचे आव्हान



■ हैदराबाद

**हैदराबादच्या** राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर उद्या पार पडणाऱ्या आयपीएलच्या २१ व्या सामन्यात अपराजित राजस्थान रॉयल्स संघाचे सनरायझर्स हैदराबादसमोर मोठे आव्हान असणार आहे. राजस्थान संघातील खेळाडू सलग पाचव्या विजयासाठी सज्ज झाले आहेत, तर हैदराबाद दुसरा विजय मिळवण्याचा प्रयत्न करणार आहे. जबरदस्त फार्मात असलेला युवा सलामीवीर वैभव सूर्यवंशीच्या फलंदाजीकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष्य आहे. हैदराबादचा सलामीवीर अभिषेक शर्मा रोखणे राजस्थानसाठी सोपे नसेल.

राजस्थानने आपले चारही सामने जिंकले आहेत. त्यामुळे हा संघ आयपीएलच्या गुणतालिकेत ८ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. हैदराबादने आतापर्यंत चारपैकी एक सामना जिंकला आणि तीन सामन्यांत पराभव पत्करावा लागला. परिणामी हैदराबादचा संघ २ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. राजस्थान संघात एक धोकादायक आघाडी फलंदाजीची फळी आणि अत्यंत संतुलित गोलंदाजी आक्रमक आहे. यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी या स्फोटक सलामीच्या जोडीने संघाच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी या हंगामात पॉवरप्लेमध्ये सातत्याने प्रतिस्पर्धी संघाच्या गोलंदाजीची धुलाई केली. ध्रुव जुरेलने तिसऱ्या क्रमांकावर स्थैर्य राखले आहे आणि संघाची लय कायम राखली आहे. त्यामुळे कर्णधार रियान परागच्या नेतृत्वाखालील मधल्या फळीची आतापर्यंत फारशी परीक्षा झालेली नाही.

तथापि, मधल्या फळीतील फलंदाजांना आतापर्यंत मिळालेल्या मर्यादित संधीचा फायदा घेता आलेला नाही आणि संघाच्या दमदार कामगिरीतील हीच कदाचित एकमेव चिंतेची बाब आहे. मात्र, या हंगामात रॉयल्सच्या गोलंदाजीत लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे.

# महाड तालुका क्रीडा मंडळ, जय भवानी मंडळ उपांत्य फेरीत

■ मुंबई

**अजित** पवार यांच्या स्मरणार्थ हनुमान क्रीडा मंडळ, गौरीशंकर क्रीडा मंडळ व कुर्ला क्रीडा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने येथील गांधी मैदानात आयोजित केलेल्या कुमार गट आणि प्रथम श्रेणी पुरुष गटाच्या कबड्डी स्पर्धेत कुमार गटात महाड तालुका क्रीडा मंडळ, जय भवानी क्रीडा मंडळाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. कुमार गटाच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात विक्रोळीच्या महाड तालुका क्रीडा मंडळाने नवशक्ती स्पोर्ट्स अकॅडमीचा ८ गुणांनी पराभव केला.


दुसऱ्या सामन्यात जय भवानी क्रीडा मंडळाने हनुमान क्रीडा मंडळाचा सहज पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. इतर सामन्यात बालवीर स्पोर्ट्स क्लबने ट्रान्सपोर्ट क्लब घाटकोपरचा १६ गुणांनी आरामात पराभव केला. तर भानवे अकॅडमी विरुद्ध पार्ले महोत्सव यांच्यात झालेल्या सामन्यात भानवे अकॅडमीने पार्ले महोत्सवांचा अवघ्या ३ गुणांनी पराभव केला. प्रथम श्रेणी पुरुष गटाच्या सामन्यात सन्मित्र क्रीडा मंडळ व चेंबूर क्रीडा मंडळ यांच्यात अटीतटीची लढत पाहायला मिळाली. विश्रांतीला दोन्ही संघाचे ९-९ असे समान गुण होते.

# बंगळूरूचा मुंबईवर १८ धावांनी दणदणीत विजय

■ मुंबई

**मुंबईच्या** वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स विरुद्ध झालेला आयपीएलचा २० वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूने १८ धावांनी जिंकला. हा बंगळुरुचा तिसरा विजय आहे. फिल सॉल्टस, विराट कोहली, रजत पाटीदारच्या अर्धशतकीय खेळीमुळे बंगळुरुने मुंबईपुढे विजयासाठी २४० धावांचे आव्हान दिले होते. मात्र हे आव्हान मुंबईच्या फलंदाजांना पेलवले नाही आणि संघाला ५ बाद २२२ धावांपर्यंत मजल मारता आल्याने या स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा पराभवाला सामोरे जावे लागले.

प्रथम फलंदाजी करताना बंगळुरुचे सलामीवीर फिल सॉल्ट आणि विराट कोहली यांनी सुरुवातीपासूनच मुंबईच्या गोलंदाजांवर आक्रमण करून एकामागून एक चौकार आणि षटकार ठोकले. या जोडीने पहिल्या विकेटसाठी १०.४ षटकांत १२० धावांची भागीदारी केली. शार्दुल ठाकूरच्या ११ व्या षटकाच्या ५ व्या चेंडूवर सॉल्ट ३६ चेंडूंत ६१ षटकार आणि ६ चौकारांसह ७८ धावा करून झेलबाद झाला. विराट



आणि कर्णधार रजत पाटीदार यांनी संघाची धावसंख्या १४.३ षटकांत १ बाद १८५ वर पोहोचवली. मग विराट ३८ चेंडूंत ५० धावा करून तंबूत परतला. पाटीदार २० चेंडूंत ५३ धावांवर खेळत असताना मिचेल सँटनरच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. जितेश शर्मा १० धावांवर झेलबाद झाला. टिम डेव्हिडने शेवटी मुंबईच्या गोलंदाजांना चांगले चोपून काढले. त्याने १६ चेंडूंत नाबाद ३४ धावा आणि रोमारियो शेफर्ड नाबाद २ धावा केल्या. त्यामुळे बंगळुरुला ४ बाद २४० धावांपर्यंत मजल मारता आली.

या धावसंख्येचा पाठलाग करताना मुंबईची धावसंख्या ५७ धावा झाली असताना सलामीवीर रोहित शर्मा रिटायर्ड हर्ट झाला. सुयश शर्माने आपल्या आठव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर रायन रिकेल्टनला ३७ धावांवर बाद केले. याच षटकाच्या पाचव्या चेंडूवर तिलक वर्मा (१) खराब फटका मारुन झेलबाद झाला. सूर्यकुमार ३३ धावा करून माघारी परतला. कर्णधार हार्दिक पंड्या आणि इतर फलंदाजांना मोठी फटकेबाजी करता आली नाही. मात्र शेर्फेन रूदरफोर्डने ३१ चेंडूंत ७१ धावा ठोकल्या. अखेर मुंबईने ५ बाद २२२ धावा केल्यामुळे बंगळुरुने १८ धावांनी विजय मिळवला.

# आशिया बॅडमिंटन चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात आयुषचा पराभव

■ निंगबो

**चीनच्या** निंगबो येथे झालेल्या आशिया बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात भारताच्या आयुष शेट्टीला पराभवाला सामोरे जावे लागले. जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या शी यु चीने त्याला २१-८, २१-१० अशा सरळ गेम्समध्ये पराभूत केले. त्यामुळे या स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या विजेतेपदासाठी भारताची प्रतीक्षा कायम राहिली आहे. १९६५ मध्ये पुरुष एकेरीचे सुवर्णपदक जिंकणाऱ्या दिनेश खन्ना यांच्यानंतर या स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत पोहोचणारा तो पहिला भारतीय ठरला. पुरुष दुहेरीमध्ये २०२३ मध्ये सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी विजेतेपद पटकावले.

# ठाण्यात मावळी मंडळाची उद्यापासून कबड्डी स्पर्धा

**ठाणे- १०१ व्या** वर्षात पदार्पण करणाऱ्या श्री मावळी मंडळाच्या ७३ व्या राज्यस्तरीय पुरुष आणि महिला गट कबड्डी स्पर्धेला १४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजल्यापासून शानदार सुरुवात होईल. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आणि ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ठाण्यातील मावळी मंडळाच्या चरई येथील पटांगणावर १४ ते १८ एप्रिलपासून ५ दिवसांच्या या कालवधीत हे सामने रंगतील. या स्पर्धेत ७० पुरुष, तर ३८ महिला संघानी आपला सहभाग घेतला.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Invitation for bids on E-Tendering basis**

Publication of NIT in News Paper and MSEDCL Web site : 13/04/2026

| Sr. No. | Tender No. | Brief scope of work | Tender Amount | Tender Fees | Tender Publication date |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/PC/HR/T-21 /2026-27 | Work of providing skilled outsourcing workers on contract basis at **Panvel Rural Division** under Pen circle. | 499.00 Lakh | 5,000/- + 18% GST | Submission of bid: 13/04/2026 To 22/04/2026 up to 23:55 Hrs. online |


For details visit website http://etender.mahadiscom.in/eTender/eatApp
PR NO 100/26 dt.10.4.26 Superintending Engineer, MSEDCL, O&M circle, Pen.



# 'जननायकन'ला ग्रहण पायरसीचे

तमिळ चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार थलपती विजय याचा 'जननायकन' हा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच इंटरनेटवर फुटल्याने (लीक झाल्याने) संपूर्ण मनोरंजन विश्वात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. विजयचा चित्रपटसृष्टीतील हा शेवटचा चित्रपट असल्याचे मानले जात असल्याने याला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. मात्र संपूर्ण चित्रपटच पायरसीच्या विळख्यात अडकल्याने चित्रपटसृष्टीतील दिग्गजांनी एकत्र येत या कृत्याचा निषेध केला आहे.

या गंभीर घटनेवर कमल हासन यांनी सडेतोड भूमिका मांडली आहे. त्यांनी 'क्ष' (ट्विटर) वर म्हटले की, चित्रपट प्रमाणीकरणाला (सर्टिफिकेशन) झालेला विलंब पायरसीसाठी खतपाणी ठरला आहे. सुपरस्टार रजनीकांत यांनीही या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. यासोबतच चिरंजीवी, सुर्या, कार्ती आणि खुशबू सुंदर यांसारख्या नामवंत कलाकारांनीही या प्रकाराचा निषेध केला असून, प्रेक्षकांना चित्रपटगृहात जाऊनच हा चित्रपट पाहण्याचे आवाहन केले आहे. राजकीय प्रवासाकडे वळणाऱ्या विजयसाठी हा एक ऐतिहासिक निरोप ठरण्याची अपेक्षा होती. मात्र या लीकेजमुळे प्रदर्शनापूर्वीच चित्रपटासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. तरीही, चित्रपटसृष्टीतील सर्व पिढ्यांचे कलाकार ज्या प्रकारे या संकटात एकत्र आले आहेत, त्यावरून पायरसी विरोधात एक मोठी चळवळ उभी राहताना दिसत आहे.



# आहान 'पहिला' ब्रँड ॲम्बेसेडर

जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या 'डेव्हिड ऑफ परफ्यूम्स'ने भारतीय बाजारपेठेसाठी आपला पहिला ब्रँड ॲम्बेसेडर (सदिच्छा दूत) म्हणून अभिनेता अहान पांडेच्या नावाची घोषणा केली आहे. ब्रँडच्या इतिहासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, या माध्यमातून भारतातील तरुण पिढीला आकर्षित करण्याचा कंपनीचा उद्देश आहे. या नव्या प्रवासाविषयी बोलताना अहान पांडे म्हणाला, या ब्रँडशी माझ्या बालपणातील आठवणी निगडित आहेत. 'कूल वॉटर' हे कदाचित मी वापरलेले पहिले परफ्यूम असावे. आज त्याच ब्रँडचा भारतासाठी पहिला ब्रँड ॲम्बेसेडर होणे ही माझ्यासाठी खूप अभिमानाची आणि सुखद धक्का देणारी गोष्ट आहे. अहान पांडेची जनरेशन झेड आणि मिलेनिअल प्रेक्षकांमधील लोकप्रियता लक्षात घेता, तो 'जेंटलमन ॲडव्हेंचरर' हे ब्रीदवाक्य भारतीय तरुणांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवेल, असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे.






# 'मातृभूमी'तून आता 'चीन'लाही वगळले!

अभिनेता सलमान खान आणि चित्रांगदा सिंग यांच्या 'मातृभूमी' या बहुप्रतिक्षित चित्रपटाबाबत सध्या मोठी खळबळ उडाली आहे. हा चित्रपट प्रारंभी 'बॅटल ऑफ गालवान' या नावाने घोषित करण्यात आला होता. मात्र यावर्षी त्याचे नाव बदलून 'मातृभूमी' असे करण्यात आले. २०२० मध्ये भारत आणि चीन दरम्यान झालेल्या संघर्षावर हा चित्रपट आधारित आहे. मात्र, अलीकडच्या काळात दोन्ही देशांमधील संबंध सुधारल्यामुळे संरक्षण मंत्रालयाने या चित्रपटातील आशयावर काही हरकती घेतल्या होत्या. आता या चित्रपटात 'चीन' या देशाचा उल्लेख पूर्णपणे वगळण्यात येणार आहे.

सुरुवातीला हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित होता. परंतु, संरक्षण मंत्रालयाने केलेल्या विनंतीनंतर सलमान खान आणि दिग्दर्शक अपूर्व लाखिया यांनी कथेत काही काल्पनिक बदल करून चित्रपटाचे पुनर्चित्रीकरण केले आहे. यामध्ये प्रेमकथा आणि पात्रांची पार्श्वभूमी अशा नवीन भागांचा समावेश करण्यात आला असून, चित्रपटाचा जवळपास ४० टक्के भाग पुन्हा चित्रीत करण्यात आला आहे. यामुळे चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही पुढे जाण्याची शक्यता आहे. यापूर्वी हा चित्रपट १५ मे रोजी प्रदर्शित होणार असल्याची चर्चा होती. मात्र सध्याची परिस्थिती पाहता ते कठीण दिसत आहे.

# आमीरचा 'आगाऊ'पणा...!

बॉलिवूडचा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' आमिर खानने आपल्या आगामी 'एक दिन' या चित्रपटासाठी एक धाडसी आणि नाविन्यपूर्ण वितरण धोरण आखले असून, चित्रपट प्रदर्शित होण्याच्या तब्बल ३९ दिवस आधीच आगाऊ नोंदणी (ॲडव्हान्स बुकिंग) सुरू केली आहे. जुनैद खान आणि सई पल्लवी यांची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट १ मे रोजी प्रदर्शित होणार आहे. सहसा चित्रपटांची तिकिटे प्रदर्शनाच्या काही दिवस आधी उपलब्ध होतात. मात्र आमिरच्या या निर्णयाने चित्रपटसृष्टीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

देशातील जवळपास २० शहरांमध्ये 'एक दिन'ची आगाऊ तिकीट विक्री सुरू झाली आहे. मुंबईत ११ पडद्यांवर बुकिंग सुरू झाले आहे. पुणे आणि चंदीगडमध्ये प्रत्येकी ३ चित्रपटगृहांमध्ये तिकीट विक्री सुरू आहे.

विशेष म्हणजे, निर्मात्यांनी अद्याप या आगाऊ नोंदणीबद्दल कोणतीही मोठी जाहिरात केलेली नाही. तरीही प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाबद्दल मोठी उत्सुकता दिसून येत आहे. आमिर खान नेहमीच आपल्या चित्रपटांच्या प्रसिद्धीसाठी आणि प्रदर्शनासाठी वेगळ्या वाटा चोखाळण्यासाठी ओळखला जातो. ४० दिवस आधी तिकीट विक्री सुरू करण्याचा हा त्याचा नवा प्रयोग बॉक्स ऑफिसवर किती यशस्वी ठरतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.



# शिल्पाचा धक्कादायक खुलासा

बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीने आपल्या कारकिर्दीतील सुरुवातीच्या काळातील एक थरारक अनुभव नुकताच एका मुलाखतीत शेअर केला आहे. १९९३ मध्ये 'बाजीगर' या सुपरहिट चित्रपटातून पदार्पण करणाऱ्या शिल्पाने, कामाप्रती असलेल्या आपल्या निष्ठेचे उदाहरण देताना सेटवर घडलेल्या एका अपघाताचा उल्लेख केला.

एका दृश्याचे चित्रीकरण सुरू असताना शिल्पाचा एका उष्ण 'एचएमआय' लाईटलास्पर्शझाला, ज्यामुळे तिची पाठ भाजली गेली. भाजल्याचे तीव्र चटके बसत असतानाही शिल्पाने त्या क्षणी कोणताही गोंधळ घातला नाही. निर्मात्यांचे नुकसान होऊ नये आणि कामात खंड पडू नये, या विचाराने तिने हा त्रास सहन केला.

विशेष म्हणजे, दुखापत झालेली असतानाही ती दुसऱ्या दिवशी चित्रीकरणासाठी सेटवर हजर झाली. दुखापतीमुळे तिला कपडे परिधान करणे कठीण जात होते, तरीही तिने आपल्या पोशाखात काही बदल करून घेतले जेणेकरून जखमेला त्रास होणार नाही.

शिल्पाच्या मते, अशाच प्रकारच्या जिद्दीमुळे आणि मेहनतीमुळे तिने चित्रपटसृष्टीत ३२ वर्षांहून अधिक काळ तग धरला आहे. निर्मात्यांनी तिला नेहमीच पसंती दिली. कारण परिस्थिती कशीही असली तरी ती कामावर हजर राहते, असा विश्वास तिने मिळवला होता. शिल्पा शेट्टी अलीकडेच रोहित शेट्टीच्या 'इंडियन पोलीस फोर्स' या वेब मालिकेत दिसली होती.

हेल्दी Me

# न्यूनगंडाचा संबंध पोटाशी?

**डॉ. तन्मय दर्डा**

**शारीरिक** आरोग्य आणि मानसिक आरोग्य या पूर्णत: एकमेकांशी पूरक असणाऱ्या बाबी आहेत. शारीरिक आरोग्य सुस्थितीत नसेल तर मनामध्ये उदासीनतेची भावना निर्माण होते, हे अनेकांना माहीत असते. परंतु मानसिक स्थिती व्यवस्थित नसेल तर त्याचा परिणाम शारीरिक आरोग्यावर होतो याची अनेकांना कल्पना नसते. परंतु आधुनिक संशोधनांमधून ही बाब आता पुरेशी स्पष्ट झालेली आहे. इरिटेबल बॉवेल सिंड्रोम (आयबीएस) सारख्या आजारांचे मूळ शोधताना अशा रुग्णांमध्ये अँग्झायटी किंवा चिंतातूरपणा, सततची अस्वस्थता ही कारणे प्रकर्षाने दिसून येतात.



पोट फुगणे, पोट साफ न झाल्यासारखे वाटणे, सतत शौचास जावे लागेल या भावनेने बेचैन वाटणे यामुळे रुग्णांच्या झोपेवर, दिनचर्येवर परिणाम होतात. त्यातून शारीरिक आरोग्याशी संबंधित काही समस्या स्वाभाविकपणे निर्माण होतात. यापलीकडे जाऊन आयबीएसचा सामना करणाऱ्या अनेक रुग्णांमध्ये आत्मविश्वास कमी झाल्याचेही दिसून आले आहे. त्यांच्यामध्ये स्वत:च्या शरीराबद्दलची नकारात्मक धारणा तयार झाल्याचे दिसून येते. या आजाराचे स्वरूप अत्यंत अनपेक्षित असल्याने आणि पचनाच्या तक्रारींबाबत समाजात असलेल्या संकोचामुळे, रुग्णाचा स्वत:वरील विश्वास हळूहळू कमी होऊ लागतो. सार्वजनिक ठिकाणी उद्भवू शकणाऱ्या संभाव्य पेचप्रसंगामुळे रुग्ण सामाजिक कार्यक्रमांपासून दूर राहू लागतो. यातून एकटेपणा आणि न्यूनगंड निर्माण होतो. परिणामी, 'आयबीएस'चे रुग्ण अनेकदा स्वत:च्या स्थितीला स्वत:लाच जबाबदार धरू लागतात. माझे शरीर सामान्य का नाही? किंवा मी साध्या गोष्टी का हाताळू शकत नाही? अशा प्रश्नांमधून स्वत:बद्दलची कठोर मते तयार होतात. ही स्व-टीका केवळ पोटापुरती मर्यादित न राहता ती रुग्णाच्या कार्यक्षमतेवर आणि कौशल्यांवरही परिणाम करते. कारण पोटाच्या समस्येमुळे कामातील एकाग्रता कमी होते. एखादी जबाबदारी पेलण्यासाठी आवश्यक असणारा स्वत:वरचा विश्वास कमी होतो.

कॅटास्ट्रोफायझिंग आणि सोमॅटायझेशन हे दोन घटक आयबीएसच्या तीव्रतेवर थेट परिणाम करतात. कॅटास्ट्रोफायझिंग म्हणजे वेदनांकडे अत्यंत नकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे आणि आपण आता हतबल झालो आहोत अशी भावना मनात निर्माण करणे, तर सोमॅटायझेशन म्हणजे मानसिक तणावाचे रूपांतर विविध शारीरिक लक्षणांमध्ये होण्याची प्रवृत्ती होय.

ज्या व्यक्तींचा स्वभाव उपजतच हळवा असतो किंवा ज्यांना सतत नकारात्मक भावनांचा अनुभव येतो, त्यांच्यामध्ये चिंतेचे प्रमाण अधिक असते आणि परिणामी त्यांना आयबीएसचा त्रास अधिक तीव्रतेने जाणवतो. आयुष्यातील जुन्या दु:खद घटना किंवा मानसिक छळ यामुळेही मेंदू आणि पचनसंस्था यांच्यातील समन्वयावर विपरीत परिणाम होतो, ज्यामुळे पोटाचे विकार बळावतात.

या चक्रातून बाहेर पडण्यासाठी आयबीएस रुग्णांवर केवळ पोटावर उपचार करून चालत नाहीत, तर रुग्णाचे मानसिक समुपदेशन करणेही तितकेच गरजेचे असते. समुपदेशनातून त्यांच्यात कमी झालेला आत्मविश्वास पूर्ववत होऊ शकतो. 'सेन्स ऑफ कोहेरन्स' म्हणजेच संकटातही आत्मविश्वास टिकवून ठेवण्याचे कौशल्य वाढवता येऊ शकते. परिणामी, रुग्ण या आजाराला अधिक चांगल्या प्रकारे हाताळू शकतात. होमिओपॅथी उपचारपद्धतीमध्ये कौन्सिलिंग आणि औषधोपचार या दोन्ही मार्गांचा अवलंब केला जात असल्यामुळे आयबीएससाठी ती प्रभावी आणि परिणामकारक ठरते. यामध्ये पोटाच्या आजारांची शास्त्रीय कारणे जाणून घेतली जातात आणि रुग्णसंवादातून त्याच्या मानसिक स्थितीचे परिपूर्ण आकलन केले जाते.

## हेल्दी टिप्स



- वाढत्या वयानुसार सांधे जरवडणे किंवा गुडघेदुखीचा त्रास सुरू होतो. यासाठी रोज रात्री अर्धा चमचा मेथी दाणे एक कप पाण्यात भिजत ठेवावेत. सकाळी उठल्यावर ते दाणे चावून खावेत आणि तेच पाणी प्यावे. मेथीमधील 'वायू' नाशक गुणधर्म सांध्यांमधील वंगण टिकवून ठेवण्यास मदत करतात.



- फुफ्फुसांच्या शुद्धीसाठी केवळ हळदीचे दूध पिण्याचा सल्ला नेहमीच दिला जातो. परंतु काही तज्ज्ञांच्या मते त्यामध्ये चिमूटभर काळी मिरी पूड टाकणे आवश्यक आहे. काळ्या मिरीमुळे हळदीतील 'कर्क्युमिन' हे तत्व शरीर लवकर शोषून घेऊ शकते. हे मिश्रण फुफ्फुसातील कफ साफ करते आणि संसर्गापासून संरक्षण देते.



- व्यायामानंतर शरीरातील पाणी कमी झाल्यास (डिहायड्रेशन), बडीशेप आणि खडीसाखर एकत्र चावून खावी. बडीशेप पोटाला थंडावा देते आणि खडीसाखर रक्तातील ग्लुकोजची पातळी त्वरित संतुलित करते. हे बाजारातील कृत्रिम पेयांपेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ आहे.

# ट्रॅकिओस्टोमीच्या अंतरंगात...

**डॉ. मनोज कुंभार**

**श्वासोच्छ्वास** ही मानवी जीवनाची सर्वात मूलभूत प्रक्रिया मानली जाते आणि ती कुठल्याही कारणाने व्यत्ययास आली की, त्वरित वैद्यकीय हस्तक्षेपाची गरज निर्माण होते. नैसर्गिक श्वसनमार्गात अडथळा निर्माण झाल्यास अथवा फुफ्फुसांपर्यंत पोहोचणाऱ्या वायूच्या प्रवाहात अडचण निर्माण झाली की, ट्रॅकिओस्टोमी ही शस्त्रक्रिया जीवनरक्षक उपाय ठरते. श्वासनलिकेत कृत्रिमरित्या उघडण्यात येणारा छोटा मार्ग हा या शस्त्रक्रियेचा केंद्रबिंदू असतो आणि या मार्गातून रुग्णाला सहज व सुरक्षितरित्या श्वास घेणे शक्य होते.




'ट्रॅकिओ' म्हणजे श्वासनलिका आणि 'स्टोमा' म्हणजे कृत्रिम उघडलेला मार्ग. या दोन शब्दांच्या संयोगातून या शस्त्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट होते. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाच्या जीवाला श्वसनविकाराचा थेट धोका उद्भवल्यास ही प्रक्रिया त्वरेने केली जाते. परंतु दीर्घकाळ कृत्रिम श्वसनाची गरज असलेल्या रुग्णांमध्येही हीच प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने केली जाते.

ट्रॅकिओस्टोमीची प्रक्रिया अत्यंत नीटनेटक्या वैद्यकीय पद्धतीने राबविली जाते. ॲनेस्थेशिया दिल्यानंतर मानेच्या खालच्या भागावर छोटा आडवा छेद दिला जातो. आसपासच्या मृदू ऊती अलगद बाजूला करून शल्यचिकित्सक श्वासनलिकेपर्यंत पोहोचतो आणि श्वासनलिकेत अचूक जागी छोटासा गोलाकार मार्ग उघडतो. या मार्गातून ट्रॅकिओस्टोमी ट्यूब घातली जाते, ती दोऱ्यांनी किंवा पट्ट्यांनी सुरक्षित केली जाते आणि रुग्णाच्या गरजेनुसार ती श्वसनयंत्रणेशी किंवा ऑक्सिजन पुरवठ्याशी जोडली जाते.

या स्त्रक्रियेनंतरची निगा ही रुग्णाच्या बरे होण्याच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची पायरी मानली जाते. ट्रॅकिओस्टोमी ट्यूब स्वच्छ ठेवणे, श्वसनमार्गात जमा होणारे स्राव नियमितपणे सक्शनद्वारे काढून टाकणे, परिसर स्वच्छ व ओलसर ठेवण्यासाठी ह्युमिडिटीचा वापर करणे, ट्यूबसभोवतालच्या कापड्या वेळेवर बदलणे आणि लालसरपणा अथवा स्राव वाढल्यास त्वरित तज्ज्ञांना कळवणे या दैनंदिन प्रक्रियांमुळे संसर्गाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. अनुभवी नाक-कान-घसा (ईएनटी) तज्ज्ञांकडून नियमित तपासणी झाली की, ट्रॅकिओस्टोमीच्या ठिकाणी योग्यरित्या भरून येणे, श्वासनलिकेतील मार्ग स्वच्छ राहणे आणि कोणतीही अनपेक्षित गुंतागुंत वेळेवर ओळखणे शक्य होते. शस्त्रक्रियेनंतरचे जीवन हा रुग्णासाठी नव्या टप्प्याचा आरंभ ठरतो. सुरुवातीला श्वास घेण्याची पद्धत वेगळी भासते. परंतु शरीर हळूहळू या नव्या मार्गाशी जुळवून घेते. काही दिवस रुग्णालयात राहण्याची गरज असते, जिथे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली श्वसन, स्वच्छता आणि देखभालीची पद्धत शिकविली जाते. बोलण्याची क्षमता सुरुवातीला मर्यादित असली तरी विशेष 'स्पीकिंग व्हॉल्व्ह'च्या साहाय्याने संवाद पुन्हा साधता येतो. ■■■





# ॲडेनोमायोसिस आणि फायब्रॉईडमधील फरक

*ॲडेनोमायोसिसमध्ये पाळीच्या काळात तीव कळ येणाऱ्या वेदना जाणवतात, तर फायब्रॉइड्समध्ये वेदना गाठींच्या जागेवर अवलंबून बदलतात.*

*दोन्ही आजारांत जास्त रक्तस्राव होऊ शकतो. मात्र त्याची पद्धत आणि तीव्रता वेगवेगळी असते.*


*प्रजननक्षमतेवर परिणाम पाहिला तर ॲडेनोमायोसिसमुळे भ्रूण रोपणात अडथळे येतात आणि वारंवार गर्भपात होण्याची शक्यता वाढते, तर फायब्रॉइड्समुळे गर्भाशयाचा आकार बदलून किंवा नलिका अडवून गर्भधारणा कठीण होऊ शकते.*



ॲडेनोमायोसिस म्हणजे गर्भाशयाच्या आतील आवरणासारख्या (एंडोमेट्रियम) ऊती गर्भाशयाच्या स्नायूंच्या थरात म्हणजे मायोमेट्रियममध्ये वाढू लागणे. यामुळे गर्भाशय जाड आणि मोठे होते, कधी कधी त्याचा आकार दुप्पट किंवा तिप्पटही होऊ शकतो. पोटात किंवा योनीमार्गात वेदना, मोठ्या गाठींसह होणारा जास्त आणि दीर्घकाळ चालणारा मासिक रक्तस्राव तसेच अत्यंत वेदनादायक पाळी ही ॲडेनोमायोसिसची प्रमुख लक्षणे मानली जातात. अनेक वेळा या आजारात ठळक लक्षणे नसल्यामुळे अनेक स्त्रियांना आपण या समस्येने ग्रस्त आहोत, याची जाणीवही होत नाही. साधारणपणे ज्यांनी गर्भाशयावर शस्त्रक्रिया करून घेतली आहे, ज्या चाळिशीच्या पुढील वयाच्या आहेत, त्यांच्यात ॲडेनोमायोसिस अधिक प्रमाणात आढळतो, असे निरीक्षण आहे. फायब्रॉईड्स म्हणजे गर्भाशयाच्या भिंतीत किंवा त्यावर वाढणाऱ्या स्नायू व ऊतींच्या गाठी. वैद्यकीय भाषेत त्यांना लिओमायोमा असेही म्हटले जाते. या गाठी कर्करोगरहित असतात आणि स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या सर्वात सामान्य सौम्य गाठी मानल्या जातात. फायब्रॉइड्समुळे वेदना, अनियमित आणि जास्त रक्तस्राव अशी अनेक लक्षणे दिसू शकतात. मात्र काही स्त्रियांमध्ये कोणतीही लक्षणे न दिसता फायब्रॉइड्स 'सायलेंट' स्वरूपातही आढळतात. फायब्रॉइड्सच्या उपचारांचा निर्णय प्रामुख्याने लक्षणांच्या तीव्रतेवर अवलंबून असतो.

मुख्य फरक : ॲडेनोमायोसिसमध्ये गर्भाशयाच्या स्नायूंमध्येच एंडोमेट्रियल ऊती वाढतात, तर फायब्रॉइड्स या गर्भाशयाच्या आत, भिंतीत किंवा बाहेर वाढणाऱ्या स्वतंत्र गाठी असतात. ॲडेनोमायोसिसचे नेमके कारण अजून स्पष्ट झालेले नसले तरी हार्मोन्समधील असंतुलन, गर्भाशयातील दाह आणि प्रसूतीशी त्याचा संबंध जोडला जातो. ■■■

# नवाकाळ शब्दकोडे-१५७४



**आडवे शब्द –**

२. पूर्वसूचना न देता, अचानक ६. 'सुसंगती सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो, कलंक मतीचा झडो ××× ××× ×××' (मोरोपंत) १२. दळणवळण, संवाद, स्पर्श १३. चूर्ण १४. भार १६. चित्त, अंतःकरण १७. इंग्रजीत स्पर्श १८. युद्ध, संघर्ष २१. मनोकामना पुरी व्हावी म्हणून देवाला कबूल केलेली गोष्ट २२. सरहद्द, मर्यादा २३. फळांचा राजा २४. पाषाण २५. हिंमत, साहस २७. कोल्हापूरची देवी २९. गुंड, मवाली ३०. पुन्हा ३१. अथवा ३२. टपाल ३४. द्राक्षांपासून बनवलेले आयुर्वेदिक टॉनिक ३७. अस्थी ३८. शुल्क ३९. थकल्यावर लागलेला श्वास ४१. माजलेला ४२. दंगेधोपे ४४. पाण्यात बुडी मारणे ४५. कॅरमबोर्डवर पसरले जाणारे चूर्ण ४८. प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंतचे दिवस ५०. रोगप्रतिबंधक औषध ५१. धाक ५३. उजेड, तेज ५५. वर्म, युक्ती ५७. घोटाळा ५८. कुबेराची सून ६०. वारस नसलेला ६२. वाऱ्याच्या उर्जेने वीज निर्मिणारे साधन ६४. विश्वास, खात्री ६६. वेढा ६७. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट ६९. अग्नी ७१. अतिशय ७२. समुद्रमंथनानंतर देवांनी हस्तगत केलेले अमरत्व देणारे पेय ७४. घाई, गडबड ७६. बळकट, तगडा ७८. जमिनीशी काटकोनात असलेली रेषा ८०. जहाज ८२. तलवारीसह असलेले आयुध ८४. हात, हस्त ८५. दुही, परकेपणा ८७. सोनेरी धान्य ८८. हास्य ९०. पद्धत ९१. सिद्धता ९४. नुकते जन्मलेले ९६. आरंभ ९७. वस्तुस्थिती, खरी स्थिती ९९. आलापी, तान १०१. कंटाळा येत नाही असे १०३. कष्टाला मागे न सरणारा, कामसू १०४. हुडहुडी १०६. समाजकंटक १०७. सूर्य १०८. अतिशय अशक्त १०९. डौलदार ११०. बाण, काठ, किनारा १११. अरण्य, कानन

**उभे शब्द –**

१. आवडलेले २. बुद्धीला पटणारे, सुसंगत ३. वातावरण निर्जंतुक करणारे नैसर्गिक सुगंधी द्रव्य ४. तमाशा कलावंतांचा संच ५. दया ६. आर्जवे, विनंती ७. मृत्युदेवता ८. वर्ष, संवत्सर ९. दिमाख, शान १०. नृत्य ११. बुद्धिमान १५. लोक १९. दुर्ग २०. मुख २४. डोंगराचा तुटलेला भाग २५. पळापळ २६. डोंगरमाथ्यावरचा सपाट भाग २७. राख २८. महिना ३०. डोंगर ३३. दुर्दैवी ३५. मराठी फास्ट फूड ३६. हल, गलबत उभे करण्यासाठी पाण्याखाली सोडलेले साधन ४०. वेतन ४२. नियम ४३. म्हातारा ४४. आस, कणा ४५. खूप बोलणारा ४६. अस्वल ४७. आश्वासन ४८. श्रीगणेशा ४९. मार्ग ५२. अतिशय नितळ ५४. दीपक ५५. समाधान ५६. मारीच राक्षसाने घेतलेले सोंग ५९. बोजा ६०. गाफील ६१. फालतू, सुमार ६२. दुसऱ्यावर अवलंबून असणे ६३. निष्णात ६५. चरबी ६६. वेग ६८. हवेत तरंगणारे ७०. श्रमिक ७१. आठ ७३. वस्त्राचा मऊ पोत ७५अ. झुंज ७७. गाव ७९. नकली ८१. महाभारतातला खादाड राक्षस ८३. वाईट सवय ८६. उणे ८८. धीर सुटलेला, हतबल ८९. धागा ९०अ. सोय, तरतूद ९२. यात्रिक, प्रवासी ९३. आळसावलेले ९५. समशेर ९७. काकडीची छोटी जात ९८. भावाची बायको १००. क्रीडा १०२. थट्टा १०५. उमर १०६. बुद्धी १०७. जाळ, अनल

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १५७३ चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. वचपा ५. रूढ ७. सुमार ९. जवाब ११. पैंजण १२. वरद १४. गढूळ १५. साम्यवादी १८. वायफळ २०. काजळ २२. उपासमार २४. नीट २७. कमाई २८. दीर २९. राजसूय ३१. बायको ३२. आडकाठी ३३. खीर ३५. नीड ३६. वेलची ३७. भगर ३९. जनक ४०. उचापतखोर ४२. बल ४४. फलक ४६. रमणी ४८. गीतकार ५०. हजारो ५३. हावरा ५५. चूर ५६. आळ ५७. कस्पटासमान ५८. घूस ६०. भवानी तलवार ६४. दाद ६५. ताल ६७. पदरव ६८. पाय ६९. काटक ७१. घटक ७२. तीर ७३. विराट ७४. आत्या ७५. रवाळ ८१. यती ८२. समजूतदार ८५. श्रवणीय ८८. धमनी ८९. माघार ९०. नरम ९१. बक ९४. कान ९५. खुरासनी ९७. बाया ९८. परिवर्तन १०१. सोगा १०२. आमराई १०४. लक १०६. डळमळीत १०७. ठीक १०८. कमलाकांत

**उभे शब्द :** १. गाजरपारखी ३. चव ४. पारवा ६. ढगळ ७. सुळका ८. रसाळ ९. जवान १०. वादी १३. दयनीय १६. बढाईखोर १७. धुमारा १९. फट २१. जग २२. उदी २३. रजनीकर २५. पायचीत २६. खोडरबर २७. कठीण ३०. सूड ३१. बालपण ३२. आग ३४. रजक ३६. वेचा ३७. भरत ३८. वाफ ४०. उणीव ४१. खोगीरभरती ४३. राजा ४५. लज्जास्पद ४७. महानता ४९. कामिनी ५०. हळवा ५१. रोग ५२. खुसपट ५४. राघू ५६. आलय ५७. कदापि ५९. सपक ६१. वावर ६२. तपास ६३. रणरागिणी ६६. लघळ ६९. कात्यायनी ७०. कर ७६. वाटाघाटी ७७. मजूर ७८. सरबराई ७९. मिश्र ८०. उधळपट्टी ८३. मनन ८४. तम ८६. वज्र ८७. यच्चयावत ९२. कस ९३. धूर्त ९४. कागाळी ९५. खुराक ९६. नीलम ९९. वन्ही १००. नड १०१. सोम १०३. मठी १०५. कला

# म्हाडा वर्षभरात १३०१२ घरे बांधणार
## अर्थसंकल्पाला प्राधिकरणाची मंजुरी




■ मुंबई

**म्हाडा** मुंबई, पुणे, कोकण, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर या मंडळांमार्फत १३०१२ घरे बांधणार आहे. चालू अर्थसंकल्पात या घरांच्या बांधकाम खर्चासाठी १०५८५.१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

२०२५-२०२६ या वित्तीय वर्षाकरिता १२३९९.२२ कोटी रुपयांच्या सुधारित आणि २०२६-२७ च्या १७४३०.७३ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाची नुकतीच मंजुरी मिळाली. म्हाडाच्या मुंबई मंडळाअंतर्गत आर्थिक वर्षात विविध उत्पन्न गटातील २५३८ घरांची उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. या बांधकाम खर्चासाठी ६७४७.४२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. कोकण मंडळाअंतर्गत विविध उत्पन्न गटातील ५११२ घरांची उभारणी करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी १४९७.६४ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. पुणे मंडळाअंतर्गत ६६४.०० कोटींसह विविध उत्पन्न गटातील ६६५ घरांचे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट आहे. नागपूर मंडळाअंतर्गत १२०६.१९ कोटींसह विविध उत्पन्न गटातील २००८ घरांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. छत्रपती संभाजीनगर मंडळाअंतर्गत २५८.३२ कोटींसह विविध उत्पन्न गटातील १४८३ घरांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

नाशिक मंडळाअंतर्गत १५१.५७ कोटींसह विविध उत्पन्न गटातील २३७ घरे आणि अमरावती मंडळाअंतर्गत ५९.९८ कोटींसह विविध उत्पन्न गटातील ९६९ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

# महिला म्हणून जबाबदारी पार पाडेन का अनेकांना संशय

■ बारामती

**बारामती** विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या व

## सुनेत्रा पवारांचे विधान

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आजपासून प्रचाराला सुरुवात केली. कन्हेरी येथील मारुती मंदिरात दर्शन घेऊन तसेच दादांच्या स्मृतिस्थळावर नतमस्तक होत त्यांनी प्रचाराचा शुभारंभ केला. त्यानंतर कन्हेरी मारुती मंदिरासमोर झालेल्या सभेत त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. सुनेत्रा पवार म्हणाल्या, एक महिला म्हणून मी ही जबाबदारी पार पाडू शकेन की नाही, असा संशय अनेकांना होता. मात्र, दादांच्या आशीर्वादाच्या रूपाने बारामतीची जनता माझ्या पाठीशी उभी राहिली. सुनेत्रा पवार पुढे म्हणाल्या की, जनतेनेच मला लढण्याचे आणि उभे राहण्याचे बळ दिले. ज्या परिवाराने राज्याला पहिले महिला धोरण दिले, त्या परिवाराची मी सून आहे. माझ्या कामाचे मूल्यमापन लिंगावरून होऊ नये, हीच अपेक्षा आहे.

# राज्यातील प्रत्येक शाळेत आता 'परिवहन समिती' स्थापन करणार

■ मुंबई

**राज्यातील** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी आता वाहतुकीचे नियम अधिक कडक केले जाणार आहेत. त्यामुळे बेसुमार भाडे आकारून पालकांना हैराण करणाऱ्या स्कूल बसचालकांच्या मनमानीला आता चाप लागणार आहे. यासाठी प्रत्येक शाळेत एक 'परिवहन समिती' स्थापन केली जाणार असल्याची माहिती राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, या संदर्भात 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (पहिली सुधारणा) नियम, २०२६' चा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यात १५ दिवसांत जनतेकडून हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. शालेय वाहतूक सुरक्षित करण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आला आहे. आता प्रत्येक शाळेत परिवहन समिती स्थापन करणे बंधनकारक असेल. ही समितीच शालेय बस वाहतुकीवर नजर ठेवणार



आहे. नवीन नियमानुसार शालेय बस चालकांना आता केवळ मासिक शुल्क आकारता येईल. आगाऊ एकरकमी शुल्क घेण्यास मनाई करण्यात आली आहे. परिवहन समितीला दर तीन महिन्यांनी आपला अहवाल सादर करावा लागेल. नियमांचे पालन न करणाऱ्या बस चालकाचा परवाना रद्द केला जाईल.

# मुंबईत बीएमडब्ल्यूची धडक
## १८ वर्षीय चालक अटकेत

■ मुंबई

**वांद्रे-वरळी** सी लिंक येथे मध्यरात्री भीषण अपघात घडला. भरधाव वेगातील बीएमडब्ल्यू कारने समोरील दुसऱ्या वाहनाला जोरदार धडक दिल्याने दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान झाले. या प्रकरणी १८ वर्षीय चालकाला पोलिसांनी अटक केली आहे. आज पहाटे सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. संबंधित तरुण बीएमडब्ल्यू कारने सी लिंकवरून जात असताना एका कारला जाऊन आदळली. अपघाताच्या वेळी मोठा आवाज झाला. बीएमडब्ल्यू कारचा पुढील आणि मागील भागाचा पूर्णपणे चक्काचूर झाला असून, दुसऱ्या वाहनाचेही मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघातानंतर सी लिंकवरील इतर वाहनचालकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि पोलिसांना माहिती दिली. वरळी पोलीस घटनास्थळी दाखल होत अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक पुन्हा सुरळीत केली.

# राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

## ३१ जणांची यादी जाहीर

■ मुंबई

**राहुरी** पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. या यादीत पक्षाध्यक्ष शरद पवार, कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्यासह पक्षाच्या ३१ नेत्यांचा समावेश आहे.

या निवडणुकीत भाजपाने ज्येष्ठ नेते शिवाजीराव कर्डिले यांचा मुलगा अक्षय कर्डिलेंना उमेदवारी दिली आहे. तर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून गोविंद मोकाटे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तसेच वंचित बहुजन आघाडीच्यावतीने संतोष चोळके निवडणूक लढवत असून, ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे अपक्ष उमेदवार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ३१ जणांच्या स्टार प्रचारकांच्या यादीत जयंत पाटील, अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, अमोल कोल्हे, राजेश टोपे, रोहित पवार, निलेश लंके, सक्षणा सलगर यांचा समावेश आहे.

# इराण-अमेरिका शांतता चर्चा निष्फळ

पान १ वरून

कार्यक्रम सोडून द्यावा हे दोन प्रमुख मुद्दे या शांतता चर्चेमध्ये कळीचे मुद्दे ठरले. इराणने होर्मुजवरील टोलवसुली तत्काळ थांबवावी आणि आपल्या अण्वस्त्र संशोधनाचा कार्यक्रम रद्द करावा या अमेरिकेच्या दोन प्रमुख मागण्या आहेत. त्या मान्य करणे इराणला कदापि परवडणारे नाही. आपला अणू कार्यक्रम आम्ही सोडून देणार नाही आणि होर्मुज आमच्याच कब्जात राहील या भूमिकेवर इराण ठाम राहिला. दोन्ही देश या मुद्यावर माघार घेण्यास तयार न झाल्याने ही प्रदीर्घ काळ चाललेली चर्चा कोणत्याही ठोस निष्कर्षाशिवाय संपली.

बैठकीदरम्यान इराणने कतार आणि अन्य आखाती देशांसह आपली परदेशांमधील जप्त केलेली मालमत्ता आपल्याला परत करावी, अशी मागणी केली. मात्र अमेरिकेच्या प्रतिनिधींनी ती फेटाळून लावली.

होर्मुज सामुद्रधुनी खुली करणे हा इराण आणि अमेरिका दोन्ही देशांसाठी प्रतिष्ठेचा मुद्दा बनला आहे. चर्चेदरम्यान होर्मुजमधून तेलाची वाहतूक टोलविरहित असावी, असा आग्रह अमेरिकेच्या प्रतिनिधींनींनी धरला. तर इराणने होर्मुजवर टोल वसुली करण्याचा आपला अधिकार अमेरिकेने मान्य करावा, अशी ठाम भूमिका घेतली.

लेबनॉनसह संपूर्ण पश्चिम आशिया क्षेत्रात शांतता प्रस्थापित करावी, ही इराणची आणखी एक महत्त्वाची मागणी आहे. चर्चे दरम्यान इराणच्या प्रतिनिधींनी ती मागणी केली. मात्र अमेरिकेच्या प्रतिनिधीनी अणु कार्यक्रम रद्द करणे आणि समुद्री सुरक्षेवर जोर दिला. त्यामुळे चर्चा पुढे सरकू शकली नाही. दोन्ही देशांना एकमेकांवर विश्वास नसणे, हेही चर्चा अपयशी ठरण्याचे एक कारण आहे. दोघांनीही एकमेकांवर आडमुठेपणाचा आरोप केला. त्यामुळे मतभेद दूर होण्याऐवजी वाद वाढला. दरम्यानच्या काळात चीन इराणला आपली अत्याधुनिक हवाई सुरक्षा प्रणाली गुप्तरित्या देणार असल्याचे वृत्त पसरले. त्यावर ट्रम्प यांनी थेट चीनला इशारा दिला. चीनने इराणला शस्त्रास्त्र पुरवठा करू नये, अन्यथा गंभीर परिणाम होतील, असा धमकीवजा इशारा ट्रम्प यांनी चीनला दिला. त्याचवेळी अमेरिका आपल्या तेल साठ्यातील १७२ मिलियन बॅरल तेल विक्रीला काढेल ज्यामुळे तेल संकट वाढणार नाही, असे ट्रम्प यांनी जाहीर केले.

## आता अमेरिकेकडून होर्मुजची नाकाबंदी

इस्लामाबाद येथील इराण-अमेरिकेतील बोलणी फिस्कटल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावरून अशी घोषणा केली आहे की, अमेरिकी नौदल आता होर्मुजच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांची नाकाबंदी करेल. मार्गातून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही जहाजाला अडवले जाईल आणि त्याची तपासणी केली जाईल, विशेषत: ज्या जहाजांनी इराणला बेकायदेशीर टोल भरला आहे, त्या जहाजांना होर्मुजमधून सुरक्षित जाऊ दिले जाणार नाही. ही नाकाबंदी लवकरच सुरू होईल. ही जागतिक खंडणी असून, आम्ही इराणला बेकायदेशीर पद्धतीने कमाई करू देणार नाही. आम्ही होर्मुजमध्ये इराणने पेरलेले सुरुंगही नष्ट करू.

# शक्तीपीठ महामार्गाच्या परिसरात भोंदूबाबा अशोक खरातची जागा

पान १ वरून

हिला कुलमुखत्यार म्हणून अधिकार देण्यात आले होते. कळमण परिसरात जमिनीचे बाजारभाव साधारण ५ ते ६ लाख रुपये प्रति एकर असताना खरातने तब्बल २१ ते २२ लाख रुपये प्रति एकर दराने जमीन खरेदी केल्याचे नोंदीतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आगामी महामार्ग प्रकल्पाची माहिती आधीच मिळवूनच ही गुंतवणूक करण्यात आल्याचा संशय तपास यंत्रणांकडून व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, विशेष तपास पथकाने खरातच्या कार्यालयाची पुन्हा झडती घेत महत्त्वाचे पुरावे जप्त केले आहेत. झडतीदरम्यान विशिष्ट प्रकारच्या औषधाच्या बाटल्या, कुजलेले पेढे आणि सॅनिटायझरच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या. न्यायवैद्यक अहवालानुसार या वस्तूंवर आणि कार्यालयातील केबिनच्या दरवाजाच्या आतील कडीवर खरातचे हातांचे ठसे आढळले असून, पीडित महिलांचे ठसे आढळले नसल्याची माहिती आहे. अशोक खरात सध्या पोलीस कोठडीत असून त्याची कोठडी उद्या संपत आहे. त्यामुळे त्याला पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे.

**OASIS GREENWAY POWER TRADING PRIVATE LIMITED**
[Tower No. 10, 8th Floor, Flat No. 805, Emerald Isle, L&T Gate No. 7, Saki Vihar Road, Powai Andheri East, Mumbai - 400072]

**Notice under sub-section (2) of Section 15 of the Electricity Act, 2003 (in Bold letters)**

1. The person above-named, a company incorporated under the Companies Act, 1956 or 2013/a partnership firm or Limited Liability Partnership or sole proprietorship firm/an individual/an association or body of individuals/an artificial juridical person (strike out whichever is not applicable) (the applicant) has made an application under sub-section (1) of Section 15 of the Electricity Act, 2003 for grant of Category V licence for inter State trading in electricity in the geographical region of India before the Central Electricity Regulatory Commission, New Delhi. The necessary details in respect of the applicant are given hereunder:

(i) **Share Capital**
1. Authorised Share Capital: Rs. 2,00,00,000/-
2. Issued Share Capital: Rs. 2,00,00,000/-
2 Subscribed Share Capital: Rs. 2,00,00,000/-
4. Paid-up Share Capital: Rs. 2,00,00,000/-

(ii) **Shareholding Pattern (Details of the Shareholders):**

| Name of the Shareholder | Citizenship | Residential Status | Type of Shares | No. of Shares | %age |
|---|---|---|---|---|---|
| Mr. Pritam Wani | Indian | Resident | Equity Shares | 1,000,000 | 50% |
| Mr. Pradeep Kothari | Indian | Resident | Equity Shares | 1,000,000 | 50% |

(iii) **Financial and technical strength:** OGPTPL team has extensive experience in power trading operations, power operations, and regulatory compliance, and meets all requisite financial criteria to operate power trading activities in accordance with CERC Norms.

(iv) **Management profile of the applicant including details of past experience of the applicant and/or the persons on the management of the applicant in generation, transmission, distribution and trading of electricity or similar activity:**

(a) **Mr. Pritam Wani:** is a seasoned professional in the Indian Power sector with over 15 years of experience across power trading, open access regulations, renewable energy and electricity market operations. His expertise spans into techno-commercial analysis, regulatory advice, strategic planning, and business development with pan-India market exposure.

(b) **Mr. Pradeep Kothari:** has an experience of 18 years in business development for conventional Power Plants, long-term PPAs, Business case studies. He has played a key role in long-term power tie-up with power utilities across India enabling availability of off-takers for Power plants and Operationalising Lon-term PPAs.

(v) **Volume of electricity intended to be traded during the first year after grant of licence and future plans of the applicant to expand volume of trading** – OGPTPL aims to commence inter-state trading operations in India by tying up contracts of expected 219 Mus during its first year and is expected to increase marginally at 15% per annum over the subsequent 5 years.

(vi) **Geographical areas within which the applicant will undertake trading in electricity** – All over India and the area as may be permitted under the provisions of the Electricity Act 2003 and relevant regulation.

(vii) **Net worth as on 31st March of three consecutive years immediately preceding the year of application or for such lesser period as may be applicable and on the date of the special balance sheet accompanying the application:**

| | As per the Special Balance Sheet dated 22.03.2026 | As on 31.03.2026 |
|---|---|---|
| Net-worth | Rs. 1,99,62,288.76/- | NA |

(viii) **Year-wise current ratio and liquidity ratio of the applicant for three years preceding the year in which the application is made, or for such lesser period as may be applicable and on the date of the special balance sheet accompanying the application:**

| | As per the Balance Sheet dated 22.03.2026 | As on 31.03.2026 |
|---|---|---|
| Current Raio | 21.01:1 | NA |
| Liquidity Ratio | 21.01:1 | NA |

(ix) **Articles of Memorandum of Association which authorised OGPTPL to undertake trading of electricity:**
"3. To carry on the business of purchase, sale, supply, import, distribute, export or transfer/ exchange and to deal as trader, agent, broker, representative or otherwise deal in all forms of electricity and in other forms of energy from any source whatsoever, both conventional and non-conventional and any commodities products, goods, etc."

(x) **Details of cases, if any, where the applicant or any of his associates, or partner, or promoters, or Directors has been declared insolvent and has not been discharged – NA**

(xi) **Details of cases, if any, in which the Applicant or any of his Associates or partners or promoters or Directors has been convicted of an offence involving moral turpitude, fraud or any economic offence during the previous three years preceding the year of making the application and the year of making the applicant and the date of release of the above person from imprisonment, if any, consequent to such conviction. – NA**

xii) **Whether the Applicant or any of his Associates, or partners, or promoters, or Directors was ever refused licence, and if so, the detailed particular of the application, date of making application, date of order refusing licence and reasons for such refusal – NA**

xiii) **Whether the Applicant has been granted a licence for transmission of electricity – NA**

xiv) **Whether an order cancelling the licence of the Applicant, or any of his Associates, or partners, or promoters, or Directors has been passed by the Commission – NA**

xv) **Whether the Applicant or any of his Associates, or partners, or promoters, or Directors was ever found guilty in any proceedings for contravention non-compliance of any of the provisions of the Act or the rules or the regulations made thereunder or an order made by the Appropriate Commission, during the year of making the application or five years immediately preceding that year? – NA**

2. The application made and other documents filed before the Commission are available for inspection by any person with Mr. Pradeep Kothari, Director; Mobile No.: +91 9594441629; Address: Tower No. 10, 8th Floor, Flat No. 805, Emerald Isle, L&T Gate No. 7, Saki Vihar Road, Powai Andheri East, Mumbai – 400072; Email: power@consultantoasis.com

3. The application made and other documents filed before the Commission have been posted on https://oasisgreenway.com/

4. Objections or suggestions, if any, on the application made before the Commission may be sent to the Secretary, Central Electricity Regulatory Commission at 6th, 7th & 8th Floors, Tower B, World Trade Centre, Nauroji Nagar, New Delhi- 110029, within 30 days of publication of this notice, with a copy to the applicant.

5. No objections or suggestions shall be considered by the Commission if received after expiry of 30 days of publication of this notice.

Sd/-
Mr. Pradeep Kothari
(Director)

**Date:** 13.04.2026
**Place:** Mumbai




# नवाकाळ

• मुंबई | सोमवार १३ एप्रिल, २०२६ • पान -८

## इलॉन मस्क यांचा चेहरा असलेला रोबोटिक श्वान

**सॅन फ्रान्सिस्को -** अमेरिकेचे अब्जाधिश उद्योगपती टेस्ला आणि स्पेसएक्ससारख्या दिग्गज कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) इलॉन मस्क यांचा हुबेहूब चेहरा असलेला एक रोबोटिक श्वान सध्या चर्चेचा विषय बनला आहे. डिजिटल आर्टिस्ट बीपल याच्या आगामी इन्फिनाईट लूप या प्रदर्शनाची जाहिरात करण्यासाठी हा रोबोटिक श्वान साऊथ बीचच्या ओरॅकल पार्क येथे रस्त्यांवरून फिरवण्यात आला. शनिवारी १८ एप्रिल रोजी हे प्रदर्शन सुरू होणार आहे.



बीपलच्या 'रेग्युलर ॲनिमल्स' या श्रेणीत मार्क झुकरबर्ग, पाब्लो पिकासो आणि बीपलचा स्वत: चेहरा असलेले रोबोटिक श्वान या प्रदर्शनात पाहता येणार आहेत.

# आशाताई
## दी लास्ट एम्परर

**ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले यांचं निधन झालं. मी माझ्या एक दोन भाषणांमध्ये आणि पुढे एकदा आशाताईंशी झालेल्या संवादात म्हटलं होतं की, लतादीदी आणि तुम्ही म्हणजे भारतीय चित्रपट संगीतातील, लिओनार्दो द विंची आणि मायकलॅन्जलो आहात.**

**लिओनार्दो** द विंचीच्या कामाकडे बघताना त्यातील परफेक्शन, कमालीचा आखीव रेखीवपणा, जबरदस्त ठहराव आणि एक सर्रकन जाणवणारी आध्यात्मिक अनुभूती जाणवत राहते. हे सगळं दीदींच्या गाण्यात जाणवत राहतं. सगळं कसं परफेक्ट, आदर्शवत वाटत राहतं.

तर मायकलॅन्जलोच्या कामात नजाकत आहे, आवेग आहे, लडिवाळपणा आणि बंडखोरी पण आहे. कधी कधी त्याची शिल्प त्या दगडातून बाहेर येण्यास आतुर आहेत असं वाटत राहतं. तसंच आशाताईंच्या गाण्यांचं. त्यांच्या गाण्यात ओढ आहे, खेळकरपणा आहे, धिटाई आहे आणि माणूस म्हणल्यावर थोडा बेधडकपणा, झुगारून देण्याची तीव्र इच्छा असणारच, ते सगळं आशाताईंच्या गाण्यात जाणवत राहतं.

'गाणं हे माझं पॅशन आहे' किंवा 'ॲक्टिंग माझं पॅशन आहे' असं म्हणत स्वतःला कलाकार आणि कालांतराने ज्येष्ठ कलाकार इत्यादी म्हणून घेणारे हल्ली ढिगाने आढळतात.

असलं म्हणण्याची मुभा नियतीने आशाताईंना कधीच दिली नाही. वयाच्या १५व्या वर्षी स्वतःला आणि कुटुंबाला उभं करायचं आहे आणि त्यासाठी काय जमतंय तर निसर्गदत्त आवाजाची देणगी. या इतक्या भांडवलावर त्यांनी गाणं गायला सुरुवात केली. अजाणत्या वयात व्यक्तिगत आयुष्यात आशाताईंनी अफाट त्रास सहन केला, पण या त्रासाने किंवा दुःखाने त्यांच्या मनातला किंतुपरंतुवर मात केली आणि आयुष्यात जी धिटाई आली ती आवाजात आली.

मी वर म्हटल्याप्रमाणे लतादीदींचा आवाज म्हणजे परफेक्शन आणि कमालीचा ठहराव. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सगळं वातावरण भारावलेलं असताना असा आवाज हा त्या काळाचा आवाज वाटावा असा आवाज आहे. अशावेळेस स्वतःचा आवाज तयार करायचा, त्यासाठी आपल्या एक्स्प्रेशनला साजेसं गाणं मिळेपर्यंत वाट पाहायची यासाठी आशाताईंनी काय पेशन्स ठेवले असतील हे त्याच जाणोत.



राज ठाकरे

'पिया तू अब तो आजा' मध्ये प्रियकराला थेट बेधडक आवाहन आहे. 'आईये मेहरबान' मध्ये लडिवाळपणा आहे, 'दिल चीज क्या है आप मेरी जान लिजिए' मध्ये नजाकत आहे. 'दम मारो दम' मध्ये बंडखोरी आहे, सगळ्या चौकटी तोडून येण्याची तीव्र उर्मी आहे. याच आशाताई मराठी भावसंगीतात 'मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश' म्हणत युगायुगांचं वैराग्याचे प्रतीक शंकर चराचरात आहेत आणि लक्ष ठेवून आहेत हे आर्तपणे सांगतात.

व्यक्तिगत आयुष्याच्या जवळपास प्रत्येक टप्प्यावर त्यांनी वादळं पहिली. तरीही आशाताई खचल्या नाहीत, दुःख हत्यार बनवलं नाही, कडवटपणा येऊ दिला नाही. दुःख हाताळायची त्यांनी कलाच जणू आत्मसात केली होती. म्हणूनच दीदी कायम दैवी वाटत राहिल्या तर आशाताई खूप मानवी वाटत राहिल्या.

जसा दीदींचा सहवास मिळाला तसाच आशाताईंचा मिळाला. मी भाग्यवान आहे की ज्यांनी या देशाच्या अनेक दशकांच्या भावविश्वाला आकार दिला त्या दोन्ही बहिणींचा मला ओतप्रोत सहवास मिळाला. माझ्यासाठी आशाताईंकडे फक्त ज्येष्ठ गायिका म्हणून बघणं हे पुरेसं नाही तर तो गाण्यातून घडलेला अलौकिक प्रवास होता. तो चिरकाल तुमच्या माझ्यासोबत राहील, नवनवीन पदर उघडत राहील.

मी मागे माझ्या भाषणांत म्हणालो होतो की, लता दीदी असतील, आशाताई असतील किंवा त्यांच्यासारखे इतर कलाकार असतील, ते जर नसते आणि त्यांनी आपल्याला त्यांच्या भावविश्वात गुंतवून ठेवलं नसतं तर या देशात कधीच अराजक आलं असतं! उत्तुंग काय असतं आणि ते कुठे बघायचं याचा मापदंड या लोकांनी आपल्याला घालून दिला!

जसं लिओनार्दो द विंची आणि मायकलॅन्जलो हे जरी वरवर परस्पर विरोधी वाटले तरी युरोपातील रेनेसाँस युगाला त्या दोघांनी वेगवेगळ्या पद्धतीने आकार दिला. तसा आकार लतादीदी आणि आशाताईंनी भारतीय चित्रपट संगीताच्या रेनेसाँस युगाला दिला. काही वर्षांपूर्वी दीदी गेल्या आणि आज आशाताई गेल्या. भारताच्या रेनेसाँस युगाचा शेवटचा महत्त्वाचा घटक आज आपल्यातून गेला!


आशाताईंना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची विनम्र श्रद्धांजली.

## भाईंदर-नायगाव दरम्यान ओव्हरहेड वायर तुटली
### लोकल सेवा विस्कळीत

■ मुंबई

**पश्चिम** रेल्वेवर आज सकाळी मेगा ब्लॉकदरम्यान भाईंदर रेल्वे स्थानक ते नायगाव रेल्वे स्थानक दरम्यान ओव्हरहेड वायर तुटल्याने लोकल सेवा विस्कळीत झाली.

सकाळी ७.५२ वाजताच्या सुमारास विरारकडे जाणाऱ्या फास्ट लाईनवरील पावर वायरमध्ये बिघाड झाला. त्यामुळे लोकल सेवा ठप्प झाली आणि हजारो प्रवासी अडचणीत सापडले. आधीच मेगा ब्लॉकमुळे सेवा प्रभावित असताना या बिघाडामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली. सुरुवातीला दोन लोकल आणि एक मेमू गाडी मार्गावर अडकून पडल्या होत्या. रेल्वे प्रशासनाने तत्काळ हालचाल करत एक लोकल आणि एक मेमू सुरक्षितपणे बाहेर काढली. मात्र एक ईएमयू गाडी काही काळ घटनास्थळी अडकलेली होती. तिला हलवण्यासाठी डिझेल इंजिनची मदत घेण्यात आली. वसई रोड रेल्वे स्थानक येथून तांत्रिक पथक आणि टॉवर वॅगन घटनास्थळी दाखल झाले आणि दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू केले. लोकल गाड्या १५ ते २० मिनिटे उशिराने धावत असल्याने प्रवाशांना प्रचंड गर्दीचा सामना करावा लागला.



## १६ ते १८ एप्रिलला सभागृहात उपस्थिती बंधनकारक! भाजपाचा खासदारांना व्हीप

■ नवी दिल्ली

**भारतीय** जनता पार्टीने लोकसभा आणि राज्यसभेतील आपल्या सर्व खासदारांना १६, १७ आणि १८ एप्रिल या तीन दिवसांसाठी व्हीप जारी केला आहे. या काळात सभागृहात अनिवार्य उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले असून, व्हीपचे काटेकोर पालन करण्यास सांगितले आहे.



लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये या तीन दिवसांत महत्त्वाचे विधेयक मांडले जाणार असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. विशेषतः महिला आरक्षण विधेयक संदर्भातील संवैधानिक दुरुस्ती प्रस्ताव या कालावधीत चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी मांडला जाणार आहे. या विधेयकासाठी दोन तृतीयांश बहुमत आवश्यक असल्याने सर्व खासदारांची उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी भाजपाने 'तीन लाईनचा व्हीप' जारी केला आहे. महिला आरक्षणाबाबत यापूर्वी २०२३ मध्ये निर्णय घेण्यात आला होता. मात्र, नव्या जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर काही दुरुस्त्या आवश्यक असल्याने हे विधेयक पुन्हा संसदेत मांडले जात आहे.

## रडारच्या स्थलांतराला गोराईवासीयांचा विरोध

■ मुंबई

**विमानतळ** प्राधिकरणाच्या उच्च तरंगलांबीच्या रडारचे दहिसर येथून गोराई येथे स्थलांतर करण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावाला गोराईतील रहिवाशांनी विरोध केला आहे. गोराई व्हिलेजर्स वेल्फेअर असोसिएशनच्या (जीव्हीडब्ल्युए) वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिण्यात आले असून, रडारच्या स्थलांतरामुळे परिसरातील पर्यावरणीय समतोल बिघडेल. तसेच सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.

९ एप्रिल रोजी वन विभागाच्या वतीने गोराईतील जामधरपाडा येथे सर्वेक्षण करण्यात आले. स्थानिकांना पूर्वसूचना न देताच वन खात्याने हे सर्वेक्षण केल्यानंतर येथील रहिवाशांमध्ये असंतोष उफाळून आला. गोराईमध्ये हे रडार नेमके कुठे उभारण्यात येणार आहे ती जागा निश्चित न करताच वन खात्याने सर्वेक्षण केले. त्यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये अस्वस्थता पसरली. सरकारकडून अशा प्रकारे दडपशाही करण्यात येत असल्याने रहिवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे, असे जीव्हीडब्ल्युएचे अध्यक्ष स्विटसी हेन्रीक यांनी सांगितले.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी विमानतळ प्राधिकरणाच्या रडारचे दहिसरहून गोराईला स्थलांतर करण्याची घोषणा केली. त्यावेळी दहिसरवासियांसाठी ती एक मोठी देणगी ठरली.

## रेल्वे स्थानकांवर आता किराणा दुकान

■ मुंबई

**रोजच्या** कामाच्या गर्दीत घरातील किराणा खरेदीसाठी वेळ मिळत नसल्याची अडचण लक्षात घेऊन भारतीय रेल्वे प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी आता थेट रेल्वे स्थानकांवरच किराणा दुकाने सुरू करण्याची योजना आखण्यात आली आहे. या उपक्रमाचा प्रारंभ कसारा रेल्वे स्थानक, वासिंद रेल्वे स्थानक आणि मानखुर्द रेल्वे स्थानक येथे प्रायोगिक तत्वावर करण्यात येणार आहे.

### भारतीय रेल्वेचा पहिलाच प्रयोग

या सुविधेमुळे प्रवाशांना प्रवासादरम्यानच तांदूळ, डाळ, तेल, साखर यांसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करता येणार आहेत. त्यामुळे वेळेची बचत होऊन प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, या उपक्रमामुळे रेल्वेला अतिरिक्त उत्पन्न मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मात्र, या योजनेबाबत काही चिंता देखील व्यक्त करण्यात येत आहेत.

## विदर्भात १ मे रोजी 'काळा दिवस' पाळणार

**नागपूर -** स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी विदर्भवादी संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या १ मे रोजी संपूर्ण विदर्भात 'काळा दिवस' पाळण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. ही घोषणा विदर्भवादी नेते वामनराव चटप यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. महाराष्ट्रात राहूनही विदर्भातील शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, विद्यार्थी आणि नोकरदारांना न्याय मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

## मराठा आंदोलकांवरील सरसकट गुन्हे मागे नाहीत

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ मुंबई

**मराठा** आरक्षण आंदोलनातील आंदोलकांवरील सर्व गुन्हे सरसकट मागे घेतले जाणार नाहीत. राज्यातील विविध ठिकाणी दाखल झालेल्या प्रकरणांचा आढावा घेतल्यानंतर गृह विभागाने ही भूमिका मांडली असून, यामुळे आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील यांना मोठा धक्का बसला आहे. गृह विभागाने अंतरवाली सराटीसह राज्यभरातील आंदोलनांदरम्यान दाखल गुन्ह्यांची माहिती मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत सादर केली. त्यानुसार, दोन टप्प्यांत एकूण १,५०९ गुन्हे नोंदवण्यात आले होते. त्यापैकी ८२८ गुन्हे मागे घेण्यात आले असून, काही प्रकरणे अद्याप न्यायालयात प्रलंबित आहेत. मात्र, पहिल्या टप्प्यातील १७ आणि दुसऱ्या टप्प्यातील ६४ असे एकूण ८१ गुन्हे गंभीर स्वरूपाचे असल्याने ते मागे घेता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच काही गुन्ह्यांवर अद्याप विभागीय समितीकडून निर्णय होणे बाकी आहे. आकडेवारीनुसार, २०१८ पर्यंतच्या पहिल्या टप्प्यात ५४८ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी २८६ गुन्हे मागे घेण्यात आले असून, काही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. दुसऱ्या टप्प्यात ९६१ गुन्हे नोंदवले गेले होते, त्यापैकी ५४२ गुन्हे मागे घेण्यात आले आहेत.

## अमरनाथ यात्रा यंदा ३ जुलैपासून सुरू होणार

■ श्रीनगर

**यंदाची** अमरनाथ यात्रा ३ जुलै ते २८ ऑगस्ट दरम्यान पार पडणार असून, ती एकूण ५७ दिवस चालणार आहे. जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी ही घोषणा केली. यात्रेसाठी नोंदणी १५ एप्रिलपासून सुरू होणार असून पहिला जत्था जम्मूतील भगवती नगर बेस कॅम्पमधून रवाना होईल. १३ ते ७० वयोगटातील भाविकांना यात्रेत सहभागी होता येणार आहे. भाविकांसाठी अनंतनागमधील पारंपरिक ४८ किमी नुनवान-पहलगाम मार्ग आणि गांदरबलमधील १४ किमी बालटाल हे दोन मार्ग खुले ठेवण्यात आले. गुहेतील पहिली पूजा १९ जून रोजी ज्येष्ठ पौर्णिमेला होणार आहे. देशभरातील सुमारे ५५६ बँक शाखांमधून तसेच ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. यंदा यात्रेच्या सुविधा वाढवून सुरक्षा व्यवस्थाही मजबूत करण्यात आली आहे.

## मुंबई जिल्हा सहकारी बँकेच्या बांद्रा पूर्व शाखेचे आज उद्घाटन

■ मुंबई

**मुंबई** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बांद्रा पूर्व शाखेचा उद्घाटन सोहळा सोमवार, १३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता विधान परिषदेचे आ. अनिल परब आणि मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आ. प्रवीण दरेकर यांच्या हस्ते पार पडणार आहे.

मोनार्च, वर्षा को. ऑप. हौसिंग सोसायटी, बिल्डिंग क्र. २, रामकृष्ण परमहंस मार्ग, गांधीनगर, बांद्रा (पूर्व) येथे होणाऱ्या या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार वरुण सरदेसाई, मुंबई जिल्हा बँकेचे ज्येष्ठ संचालक शिवाजीराव नलावडे, संचालक आ. प्रसाद लाड, आ. सुनिल राऊत, नंदकुमार काटकर, संचालिका शिल्पा सरपोतदार, महाराष्ट्र राज्य कंझ्युमर फेडरेशनचे अध्यक्ष विठ्ठल भोसले उपस्थित राहणार असल्याची माहिती मुंबई बँकेचे उपाध्यक्ष व निमंत्रक सिद्धार्थ कांबळे, मुख्य सरव्यवस्थापक संदीप सुर्वे आणि कार्यकारी संचालक डी. एस. कदम यांनी दिली.




## वॉशिंग्टनमध्ये उभारणार भव्य 'आर्क डी ट्रम्प' स्मारक

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शांततेचे नोबेल पुरस्कार हुकल्यानंतर आता आपल्या नावाने राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये अतिभव्य असे स्मारक उभारण्याच्या तयारीत आहेत. आर्क डी ट्रम्प असे या स्मारकाचे नाव आहे.**

■ वॉशिंग्टन

**आर्क** डी ट्रम्पची उंची २५० फूट आहे. कमानीसारख्या प्रवेशद्वारावर सोन्याने मढवलेला एका महिलेचा पुतळा आणि महिलेच्या हातात अमेरिकेच्या स्टॅच्यू ऑफ लिबर्टीप्रमाणे दिसणारी ज्योत असे या स्मारकाचे आरेखन करण्यात आले आहे. जर या स्मारकाला मंजुरी मिळाली तर हे स्मारक अमेरिकेच्या कॅपिटल बिल्डिंग आणि लिंकन स्मारकाहून उंच असेल.

जगातील कोणत्याही स्मारकापेक्षा हे स्मारक सुंदर आणि शानदार असेल, असे ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर लिहिले आहे. राजधानीचा चेहरामोहरा बदलून टाकण्याच्या ट्रम्प यांच्या वादग्रस्त योजनेमध्ये हे स्मारक समाविष्ट आहे.



मात्र या स्मारकालाही ट्रम्प यांच्या याआधीच्या बॉलरुम प्रकल्पाला झाला होता तसाच विरोध होण्याची शक्यता आहे.

## फडणवीसांना शिकारीचा छंद टप्प्यात आली की बार उडवणार

■ मुंबई

**सध्या** राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या 'भोंदू खरात बाबा' प्रकरणावर उबाठा खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत सूचक विधान केले.

### खरात फाईल्सवरून राऊतांचे वक्तव्य

ते म्हणाले की, हे प्रकरण साधे नसून याला मोठे राजकीय अँगल आहेत. या प्रकरणाच्या माध्यमातून येणाऱ्या काळात अनेक नेत्यांची शिकार केली जाणार आहे. राजकीय बळी घेणे हा देवेंद्र फडणवीस यांचा छंद आहे. सुधाकरराव नाईक यांचे एक प्रसिद्ध वाक्य होते की 'शिकार टप्प्यात आली की बार उडवायचा' फडणवीस जरी सुधाकरराव नाईक नसले, तरी त्यांना अशा प्रकारच्या शिकारीचा नाद नक्कीच आहे. खरातच्या माध्यमातून आता आपोआप अनेकांचे बळी जातील.

ते पुढे म्हणाले की, खरात बाबाच्या प्रकरणात कोण किती मिनिटे कोणाशी बोलले, ही अत्यंत गोपनीय माहिती असते. पण मुख्यमंत्री कार्यालयाच्या मदतीने ती माहिती बाहेर आली. गृहमंत्रालय किंवा मुख्यमंत्री त्यांच्या मदतीशिवाय सीडीआर तुम्हाला मिळू शकणार नाही. कोणाला तरी जाणीवपूर्वक ही माहिती बाहेर काढायची आहे. त्यामुळे हे सत्य आहे की, खरात बाबाच्या माध्यमातून अनेक गोष्टी उघड केल्या जातील.